सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ३ रा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. २१ जानेवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## बाळासाहेब ठाकरे यांच्या जंयतीदिनी ठरणार शिवसेना कोणाची ?

### शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाची सुनावणी पुन्हा एकदा पुढे ढकलली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१नवी दिल्ली**

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाची सुनावणी पुन्हा एकदा पुढे ढकलण्यात आली आहे. शुक्रवारी २३ जानेवारीपासून ही सुनावणी होणार आहे. शिवसेना पक्ष आणि चिन्ह कोणाचे याबाबतची अंतिम सुनावणी आजपासुन सर्वोच्च न्यायलायत सुरु होणार होती. सुनावणी सुरु होण्यापूर्वीच पुढची तारीख मिळाली आहे. येत्या २३ जानेवारीपासून सुनावणी सुरु होणार आहे, विशेष म्हणजे २३ जानेवारी रोजी शिवसेना स्थापन करणारे बाळासाहेब ठाकरे यांची जयंती असून हे त्यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यामुळे बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीदिनी सुनावणीला सुरुवात होऊन जन्मशताब्दी वर्षात तरी पक्ष आणि चिन्ह कोणाचे याचा निर्णय होणार का, असा सवाल उपस्थित होत आहे.

**कोणामुळे सुनावणी पुढे गेली ?**

शिवसेना आणि राष्ट्रवादी यांच्या नाव आणि चिन्हाबाबत आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार होती. आज अंतिम सुनावणी घेऊन पुढील दोन-तीन दिवसांमध्ये निर्णय येण्याची शक्यता होती. मात्र आज पुन्हा एकदा सुनावणी




पुढे ढकलण्यात आली. २१ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता सुनावणी घेतली जाईल असे आज कोर्टाकडून सांगण्यात आले.

अंतिम सुनावणीसाठी पाच तासांचा वेळ उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या वकिलांना देण्यात येणार होता. मात्र आज सॉलिसिटर जनरल यांना दुसऱ्या एका प्रकरणात सुनावण्यासाठी जावे लागणार असल्यामुळे त्यांनी वेळ वाढवून मागितला. त्यावर कोर्टाने दोन्ही पक्षकारांची मते जाणून घेतली आणि शुक्रवारी २३ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता सुनावणी घेण्याचे ठरले आहे.

**शिवसेना पक्ष आणि चिन्हाची सुनावणी आता शुक्रवारी**

बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेला शिवसेना पक्ष आणि त्यांचे धनुष्यबाण चिन्ह निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांच्या गटाला दिले आहे. विधिमंडळातील त्यांच्या आमदारांच्या संख्येच्या आधारे आयोगाने त्यांना पक्ष आणि चिन्ह बहाल केले. हाच निर्णय विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी कायम ठेवत विधिमंडळातही शिवसेना ही एकनाथ शिंदे यांचीच असल्याचा निवाडा दिला. निवडणूक आयोगाच्या निर्णयाला उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. साधारण साडेतीन वर्षांपासून हा खटला सुरु आहे. दरम्यानच्या काळात लोकसभा निवडणूक झाली. २०१९ च्या विधानसभेचा कार्यकाळ संपला, त्यामुळे शिंदेंसह त्यांच्यासोबत गेलेल्या आमदारांवरील अपात्रतेचा खटला निवाड्याविनाच राहिला. मात्र शिवसेना पक्ष आणि चिन्ह हे कोणाचे या खटल्याला फक्त तारखा मिळत आहेत. दरम्यानच्या काळात सर्वोच्च न्यायालयात चार सरन्यायाधीश येऊन गेले. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या पीठासमोर हा खटला आहे. त्यांचा एक वर्षाचा कार्यकाळ आहे. तर यंदाचे वर्ष हे शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यांच्या जयंतीदिनी खटल्याच्या सुनावणीला सुरुवात होऊन याच वर्षात हा निकाल लागेल अशी आपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मशालीवर निवडून आलेले नगरसेवक मनसेत गेले तरी कारवाई होणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१मुंबई**

कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीत शिवसेना आणि भाजप यांची युती झाली होती. शिवसेनेला ५३ तर भाजपला ५० जागांवर विजय मिळाला. शिवाय ठाकरे गट ११, मनसे ५ आणि शरद पवार गटाला १ जागा मिळाली आहे. तसेच काँग्रेसने २ जागा जिंकल्या आहेत. आता भाजप आणि शिवसेनेकडून स्वबळावर सत्ता स्थापनेसाठी प्रयत्न केले जात आहेत. अशातच, मंगळवारी (ता. २० जानेवारी) जेव्हा कोकण विभागीय आयुक्तांकडे पक्षाच्या गटाच्या नोंदणीसाठी ठाकरेंच्या नगरसेवकांना हजर राहण्यास सांगण्यात आले, तेव्हा ठाकरेंचे कल्याण डोंबिवलीतील ११ नगरसेवकांपैकी केवळ ७ च



नगरसेवक उपस्थित होते. ज्यामुळे ठाकरेंचे २ नगरसेवक शिंदेंकडे आणि २ नगरसेवक हे मनसेत गेल्याची चर्चा सुरू आहे. पण मशालीवर निवडून आलेला कोणताही नगरसेवक कुठेही गेला तरी त्यांच्यावर कायदेशीर कारवाई होणारच, असे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांच्याकडून सांगण्यात आले आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी बुधवारी (ता. २१ जानेवारी) प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना कल्याण डोंबिवली महापालिकेतील चार नगरसेवक नॉट रिचेबल असण्याबाबत विचारणा करण्यात आली. तेव्हा याबाबत खासदार राऊत म्हणाले की, जे सदस्य गट निर्मितीसाठी उपस्थित राहत नाहीत, त्यांच्यावर अपात्रतेची कायदेशीर कारवाई सुरू आहे आणि ती यशस्वी होईल. मशाल चिन्हावर निवडून आलेले सर्व लोक आता पक्षाचेच आहेत. पक्षाची आचारसंहिता किंवा निवडणूक आयोगाचे नियम न पाळल्यास कारवाई केली जाईल. त्यामुळे ठाकरेंच्या मशालीवर विजयी झालेला कोणताही नगरसेवक कुठेही गेल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई होणारच, असे यावेळी राऊतांकडून स्पष्टपणे सांगण्यात आले.

## सत्तेत असू तरच, केडीएमसीत शिवसेनेला साथ देण्यावर मनसेच्या राजू पाटलांचे स्पष्ट मत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१बेलापूर(नवी मुंबई)**

कल्याण डोंबिवली महापालिकेमधील राजकीय समीकरण बदलताना पाहायला मिळत आहे. गुरुवारी (ता. २२ जानेवारी) २९ महापालिकांसाठीच्या महापौर पदासाठी आरक्षण सोडत जाहीर होणार असून याआधीच आता कल्याण डोंबिवलीत राजकीय घडामोडींना वेग आला आहे. कारण, मनसेने या महापालिकेत शिंदेंच्या शिवसेनेला पाठिंबा जाहीर केला आहे. निवडणुकीच्या काळात ज्या शिंदेंच्या शिवसेनेवर मनसेने गंभीर आरोप केले, त्याच सेनेला आता मनसेचे नेते राजू पाटील यांनी आपल्या नगरसेवकांना विचारून पाठिंबा जाहीर केला आहे. मनसे नेते राजू पाटील आणि शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांची आज बुधवारी (ता. २१ जानेवारी) भेट झाली. या भेटीनंतर खासदार शिंदेंनी मनसेने आम्हाला पाठिंबा दिल्याचे प्रसार माध्यमांसमोर जाहीरपणे सांगितले. ज्यानंतर आता राजू पाटलांनीही याबाबत स्पष्ट मत व्यक्त केले आहे.



मनसेने कल्याण डोंबिवली महापालिकेत शिवसेनला पाठिंबा जाहीर केल्यानंतर मनसे नेते राजू पाटील यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले की, कल्याण डोंबिवलीत गेली काही दिवस आकडेमोड आणि पळवापळवीचा जो खेळ सुरू आहे, तो कुठेतरी थांबावा यासाठी हा आम्ही निर्णय घेतला. भविष्यात समित्यांच्या, कमिट्यांच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे अशावेळेस गोंधळ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे एक बाजू स्थिर राहावी, या हेतूने पाठिंबा दिला. शिवसेना शिंदे गट आणि भाजप एकत्र लढल्याने आम्ही त्यांना समर्थन देऊन त्यांच्यासोबत जात आहोत, असे राजू पाटील यांनी स्पष्टपणे सांगितले. मनसेला यामध्ये काय भेटणार? यावर मनसे नेते राजू पाटील म्हणाले की, भेटायचे वगैरे काही नाही. पण सत्तेत असल्यावर काम झाली तरी ते बस्स आहे. विकासकामे होण्यासाठीच आम्ही हा पाठिंबा जाहीर केल्याचे यावेळी पाटलांनी सांगितले.

तसेच, आम्ही युतीत (शिवसेना ठाकरे गट - मनसे) लढलो होतो. पण काही नगरसेवक गायब झाले. अशावेळेस आम्हाला आमच्या नगरसेवकांसोबतच ठाकरे गटातील नगरसेवकांचीही चिंता होती. त्यासाठी आम्ही सेनेला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. केडीएमसीची संपूर्ण जनता या राजकारणाला वैतागली आहे. त्यामुळे इतर कोणत्याही गोष्टी होऊ नये, यासाठी आम्ही निर्णय घेतला आहे. हा स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी घेतलेला निर्णय नाही. जेव्हा निवडणुकीचे आकडे समोर आले आणि आम्ही राज ठाकरेंना गणित सांगितले तेव्हा त्यांनी स्थानिक पातळीवर नगरसेवकांच्या मताप्रमाणे निर्णय घेण्यास सांगितले. त्यामुळे आता आम्ही हा पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. तर, भाजप आणि शिवसेना शिंदे गट एकत्र असल्याने भाजपला बाजूला टाकण्याच प्रश्नच येत नाही, असेही यावेळी राजू पाटलांनी म्हटले.

## अकोल्यात सत्ता समीकरण बदलणार; भाजपची सत्तेसाठी ठाकरे गटाला 'ऑफर', पक्षप्रमुख काय निर्णय घेणार?




**अकोला महापालिकेतील पक्षीय बलाबल**

| | |
|---|---|
| एकूण जागा | ८० |
| बहुमताचा आकडा | ४१ |
| भाजप | ३८ |
| काँग्रेस | २१ |
| उबाठा | ०६ |
| शिंदे सेना | ०१ |
| अजित राष्ट्रवादी | ०१ |
| शरद राष्ट्रवादी | ०३ |
| वंचित | ०५ |
| एमआयएम | ०३ |
| अपक्ष | ०२ |

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अकोला**

राज्यातील २९ महापालिका निवडणुकांचे निकाल जाहीर झाले आहेत. निवडणुकीच्या निकालानंतर आता सत्ता स्थापनेसाठी राजकीय पक्षांकडून जुळवाजुळवी सुरू झाली आहे. अकोल्यात भाजपला सत्ता स्थापन करण्यासाठी ३ नगरसेवकांच्या पाठिंब्याची गरज आहे. यासाठी भाजपने बैठकांचा सपाटा लावला आहे. सत्ता स्थापनेसाठी भाजपची ठाकरे गटाशी बैठक पार पडली. या बैठकीत भाजपने ठाकरेंच्या शिवसेनेला सत्ता स्थापनेसाठी ऑफर दिल्याची माहिती मिळत आहे.

अकोल्यात बहुमताच्या ४१ आकड्याची जुळवणी करण्यासाठी भाजपने थेट ठाकरेंच्या शिवसेनेला 'ऑफर' दिलीय. भाजपचे माजी महापौर विजय अग्रवाल आणि ठाकरेंच्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गोपाल दातकर यांची अकोल्यात बैठक झाली. ८० सदस्यांच्या अकोला महापालिकेत कोणत्याही पक्षाला बहुमत नाही. ३८ जागा जिंकत भाजप सर्वात मोठा पक्ष आहे. तर ठाकरेंच्या शिवसेनेचे ६ नगरसेवक आहे.

भाजपने ठाकरेंच्या शिवसेनेला मदतीची मागणी केली आहे. उपमहापौरपद आणि स्थायी समिती अध्यक्षपदाची शिवसेनेकडून मागणी झालीची माहिती सूत्रांनी दिलीय. सेनेच्या प्रस्तावावर भाजप चर्चा करणार आहे. या दरम्यान भाजप आणि ठाकरेंच्या शिवसेनेच्या नेत्यांमध्ये झालेल्या गुप्त बैठकीवर शिक्कामोर्तब झालाय. शहरातील विकासाच्या महत्त्वाचे मुद्द्यावर बैठकीत चर्चा झाल्या, जोही आमच्या मुद्द्यांवर सकारात्मक भूमिका दाखवेल, त्याच्यासोबत आम्ही जाणार आहे. तसेचं सर्वांसाठी दरवाजे खुले असल्याचे देशमुख म्हणाले आहे.

## मुंबई महापालिकेत मराठी टक्का ठाकरेंचाच भाजपचे मराठी ५२, गुजराती १९ , युपीवाले १३

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१ मुंबई**

मुंबई महानगरपालिका निवडणुकांच्या निकालानंतर आता राजकीय समीकरण बदलताना पाहायला मिळत आहेत. महानगरपालिका निवडणुकीत मराठी अस्मितेचा मुद्दा चांगलाच गाजला होता. मात्र निकाल पाहता, पालिकेच्या २२७ जागांपैकी १४७ जागांवर मराठी नगरसेवक निवडून आले असले, तरी सत्तास्थापन करणाऱ्या पक्षांमध्ये अमराठी प्रतिनिधींचे संख्याबळ लक्षणीय असल्याचे स्पष्ट झाले आहे.

मराठी नगरसेवकांच्या संख्येत सर्वाधिक वाटा हा शिवसेना ठाकरे गटाचा आहे. ठाकरे गटाचे एकूण ५८ मराठी नगरसेवक निवडून आले आहेत. भाजपचे ५२ मराठी नगरसेवक विजयी झाले असून, पक्षाच्या एकूण ८९ जागांपैकी तब्बल ३७ नगरसेवक अमराठी आहेत. शिंदे गटाच्या शिवसेनेला २९ जागा मिळाल्या असून त्यातीलही काही नगरसेवक हे अमराठी आहेत.

या निवडणुकीत भाजपने ८९ तर शिवसेना शिंदे गटाने २९ जागा जिंकत महायुतीला बहुमत मिळवून दिले. दुसरीकडे, ठाकरे बंधूंच्या



गटाला एकत्रित ७१ जागांवर समाधान मानावे लागले, त्यात शिवसेना ठाकरे ठाकरे गटाच्या ६५ आणि मनसेच्या ६ जागांचा समावेश आहे. वंचित बहुजन आघाडीसोबत लढलेल्या काँग्रेसला २४ जागा मिळाल्या, तर इतर पक्षांच्या खात्यात १४ जागा जमा झाल्या.

**अमराठी प्रतिनिधित्व लक्षणीय**

या निवडणुकीत गुजराती, उत्तर भारतीय आणि मुस्लीम समाजातील नगरसेवकांची संख्याही मोठी आहे. मुंबईत २१ गुजराती आणि १७ उत्तर भारतीय नगरसेवक निवडून आले आहेत. मुस्लीम समाजाचे एकूण ३१ नगरसेवक विजयी झाले असून, त्यातील १४ नगरसेवक काँग्रेसकडून आहेत.

## अमृता फडणवीसांनी सांगितलं, मुंबईचा महापौर कोण होणार ?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१मुंबई**

राज्यातील २९ महानगरपालिकांची रणधुमाळी संपलेली आहे. यामध्ये भाजपला मोठं यळ मिळालं आहे. अत्यंत चुरशीची मानली जाणाऱ्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत देखील भाजपने यश मिळवले आहे. मात्र, शिवसेनेच्या साथीशिवाय भाजपचा महापौर बसणे शक्य नाही. त्यामुळं मुंबई महापालिकेचा महापौर कोण होणार याची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरु आहे. अशातच मुंबईच्या महापैर पदाबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी मोठं वक्तव्य केलं




आहे. मुंबईचा महापौर हा महायुतीचा मराठी माणूस होणार असल्याचे अमृता फडणवीस म्हणाल्या.

मुंबईचा महापौर भाजपा होणार की शिंदेच्या शिवसेनेचा होणार असी जोरदार चर्चा राजकी वर्तुळात सुरु आहे. त्याचबरोबर महापौर मराठी होणार की अमराठी यावरुन देखील चर्चा सुरु आहे. अशातच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. मुंबईचा महापौर हा महायुतीचा मराठी माणूस होणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसचे यावेळी त्यांनी विविध विषयावंर भाष्य देखील केलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दावोस दौऱ्यावर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी टीका केली होती. यावर देखील अमृता फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली. ते बिझनेससाठी गुंतवणुकीसाठी दावोसला गेले आहेत. महाराष्ट्राला एक प्लटफॉर्म मिळत आहे. इकॉनॉमिक डेव्हलपमेंट आहे. ही तीन दिवसाची पिकनिक होत नाही. पिकनिकला ते माझ्याशिवाय जाऊ शकत नाहीत असेही अमृता फडणवीस म्हणाल्या. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत भाजप शिवसेना युतील भरघोस य़स मिळालं आहे. सत्ता स्थापनेसाठी आवश्यक असणारं संख्याबळ या युतीला मिळालं आहे.

## मनसेची शिंदेंच्या शिवसेनेला साथ; प्रविण दरेकर म्हणतात, आक्षेप असण्याचं काही कारण नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१कल्याण**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या १२२ जागांसाठी निवडणूक पार पडली आहे. या निवडणुकीत शिवसेना आणि भाजप यांची युती झाली होती. शिवसेनेला ५३, तर भाजपला ५० जागांवर विजय मिळाला. महत्त्वाचे म्हणजे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेवर सत्ता स्थापन करण्यासाठी ६२ हा बहुमताचा आकडा आवश्यक असून दोन्ही पक्ष युती म्हणून सत्ता स्थापन करू शकतात. मात्र आज (२० जानेवारी) मनसे नेते तथा माजी आमदार राजू पाटील हे शिवसेना शिंदे गटाचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्यासोबत चर्चेसाठी पोहोचले. त्यानंतर कल्याण-डोंबिवली महापालिकेत मनसेने शिवसेनेला समर्थन दिल्याची माहिती स्वतः खासदार श्रीकांत शिंदेंनी दिली आहे. याप्रकरणी आता भाजपा नेते प्रविण दरेकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे.



माध्यमांशी संवाद साधताना प्रविण दरेकर यांना प्रश्न विचारण्यात आला की, कल्याण-डोंबिवलीमध्ये शिवसेना शिंदे गट आणि मनसे एकत्र झाली आहे, त्यामुळे कुठेतरी भाजपला हा धक्का म्हणायचा का? या प्रश्नावर प्रविण दरेकर म्हणाले की, भाजपला अजिबात धक्का मानायचं काहीच कारण नाही. कारण आपण बघितलं तर शिवसेना शिंदे गटाला आपला पक्ष वाढवण्यासाठी इतर पक्षांना सोबत घेण्याचा अधिकार आहे. पण यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टपणे सांगितलं आहे की, आम्ही निवडणुकीपुरते एकमेकांच्या विरोधात असतो, परंतु निवडणुकीनंतर शहराच्या विकासासाठी जर कोणी समर्थन देत असेल, पाठबळं देत असेल तर त्याचे स्वागत आहे. कारण प्रत्येक पक्षाचा उद्देश हा त्या शहराच्या विकासाचा अजेंडा असतो. त्यामुळे जर विकासाच्या भूमिकेवर मनसे शिवसेना शिंदे गटासोबत येत असेल आणि महायुतीत शिवसेना शिंदे गटाचा भाग बनत असेल, त्यांना समर्थन देत असेल, तर त्याचे स्वागत आहे, अशी भूमिका दरेकर यांनी मांडली.प्रविण दरेकर म्हणाले की, कल्याण-डोंबिवलीमध्ये भाजप आणि शिवसेना शिंदे गटाचं निर्विवाद बहुमत आहे. त्यामुळे सत्ता स्थापनेत काही अडचण नाही. परंतु जर शिवसेना शिंदे गटाला आणखी पक्ष वाढवायचा असेल, सोबत काही घटक पक्ष घ्यायचे असतील, तर आमचं आक्षेप असण्याचं काही कारण नाही. तसेच श्रीकांत शिंदे यांनी सांगितलं आहे की, कल्याण-डोंबिवलीमध्ये महायुती म्हणूनच आम्ही सत्ता स्थापन करू. त्याचपद्धतीने महायुतीचे वरिष्ठ नेते, तसेच आमचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली एकनाथ शिंदे यांच्याशी संवाद साधून महायुतीची सत्ता त्याठिकाणी बसेल, अशी माहिती दरेकर यांनी दिली.

## संपादकीय ......

# भाजपमध्ये ‘नवीन’ युगाची सुरुवात

*भाजपच्या राष्ट्रीय नेतृत्वात नितीन नवीन यांच्या निवडीने पक्षात पिढीबदलाचा स्पष्ट संकेत दिला आहे. संघटनात्मक अनुभव, संघनिष्ठ पार्श्वभूमी आणि आधुनिक राजकीय रणनीती यांचा समन्वय साधत भाजप आगामी दशकासाठी तयारी करत असल्याचे या निर्णयातून दिसते. अध्यक्षपद ही नवीन यांच्यासाठी सन्मानासोबतच कठोर राजकीय कसोटी ठरणार आहे.नितीन नवीन हे मंगळवारी भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले. ते भाजपचे बिहारमधील नेते. पक्षाने त्यांना आधी कार्यकारी अध्यक्ष आणि त्यानंतर निवडणूक प्रक्रियेतून राष्ट्रीय अध्यक्षपदी नियुक्त करणे हा पक्षाच्या संघटनात्मक धोरणातील एक महत्त्वाचा निर्णय आहे; मात्र हा बदल अचानक झालेला नसून टप्प्याटप्प्याने नेतृत्व तयार करण्याच्या भाजपच्या प्रस्थापित पद्धतीशी सुसंगत आहे. अर्थात, धक्कातंत्र म्हणावे अशी नितीन नवीन यांची निवड आहे. कारण, राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान, धर्मेंद्र प्रधान, भूपेंद्र यादव, मनोहर लाल खट्टर अशा अनेक बड्या नावांची चर्चा होती; मात्र भाजपने कुठेही चर्चेत नसलेले नितीन नवीन यांना आधी कार्याध्यक्ष नेमले आणि मंगळवारी त्यांना पूर्णवेळ अध्यक्ष म्हणून निवडले गेले. याआधी जे. पी. नड्डा यांनाही अशाच पद्धतीने सुरुवातीला कार्याध्यक्ष आणि नंतर राष्ट्रीय अध्यक्ष बनवण्यात आले होते. त्यामुळे नितीन नवीन यांची निवड ही प्रयोगात्मक नव्हे, तर विविध बाजू हेरून केलेली नेतृत्व निवड असल्याचे स्पष्ट होते.*

*भाजपच्या संघटनात्मक परंपरेत राष्ट्रीय अध्यक्षपद नेहमीच महत्त्वाचे राहिले आहे. आजवर अटल बिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी, कुशाभाऊ ठाकरे, बंगारू लक्ष्मण, जन कृष्णमूर्ती, व्यंकय्या नायडू, राजनाथ सिंह, नितीन गडकरी, अमित शहा, जगत प्रकाश नड्डा यांनी आतापर्यंत भाजपचे अध्यक्षपद भूषविले आहे. या परंपरेत आता नितीन नवीन यांचे नाव जोडले गेले आहे.*

*भाजपने नितीन नवीन यांच्या हाती पक्षाची धुरा देण्याच्या निर्णयातून जुनी आणि नवी पिढी यांच्यातील सांगड अधिक ठळकपणे अधोरेखित केली आहे. नितीन नवीन हे वयाने तरुण असले, तरी त्यांच्याकडे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भारतीय जनता युवा मोर्चा, बिहार राज्य सरकार आणि राष्ट्रीय पातळीवरील संघटनात्मक जबाबदाऱ्यांचा अनुभव आहे. त्यामुळे ते केवळ तरुण चेहरा नसून अनुभवी नेतृत्व म्हणून पुढे येतात. नितीन नवीन यांच्या नेतृत्वातून नवीन युग ही संकल्पना केवळ व्यक्तीबदलापुरती मर्यादित राहत नाही. भाजप नेतृत्वाच्या वयोगटात बदल करत असतानाच संघटनात्मक शिस्त, अनुभव आणि वैचारिक सातत्य कायम ठेवण्याचा प्रयत्न करत आहे, असे दिसते. नेतृत्व अधिक तरुण करणे, निवडणूक व्यवस्थापनात आधुनिकता वाढवणे आणि पुढील काही दशकांचा विचार करून पक्षाची मांडणी करणे या व्यापक राजकीय रणनीतीचा हा भाग असल्याचे राजकीय निरीक्षक मानतात.*

*आजचे राजकारण हे वैचारिक संघर्षाचे आहेच शिवाय बूथ पातळीवरील संघटन, आधुनिक प्रचार यंत्रणा, माहितीचे विश्लेषण आणि प्रभावी संवाद हे घटकही निर्णायक ठरत आहेत. या पार्श्वभूमीवर नितीन नवीन यांची छत्तीसगडमधील संघटनात्मक कामगिरी महत्त्वाची ठरते. काँग्रेस सरकारविरोधात संघटना उभी करून भाजपला सत्तेत आणण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. छत्तीसगड हे भाजपसाठी अवघड राज्य मानले जात असतानाही भाजपला मिळालेला विजय हे दाखवून देतो की, नितीन नवीन केवळ बिहारपुरते मर्यादित नेते नाहीत. यावरूनच भाजप आगामी निवडणुकांसाठी दीर्घकालीन तयारी करत असल्याचा संदेशही मिळतो.देशभरात नव्या पिढीचा विशेषतः जेन-झीचा प्रभाव वाढत आहे. या पिढीसाठी नेतृत्वाचा चेहरा आक्रमकतेपेक्षा संवादकेंद्रित, प्रामाणिक आणि समकालीन असणे महत्त्वाचे ठरते. नितीन नवीन यांचे वय, कार्यशैली आणि संघनिष्ठ पार्श्वभूमी भाजपला नव्या मतदारांशी जोडण्यास मदत करू शकते, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यांच्या निवडीतून एकनिष्ठता, सातत्य आणि संघटनात्मक कामगिरी या गुणांना प्राधान्य दिल्याचेही दिसते.राष्ट्रीय अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर नितीन नवीन यांच्यासमोर असलेली खरी कसोटीही लगेच सुरू झाली आहे. पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू या दोन महत्त्वाच्या राज्यांमधील आगामी विधानसभा निवडणुका हे त्यांच्यासमोरचे प्रमुख आव्हान असणार आहे. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस, तर तामिळनाडूमध्ये द्रविड मुन्नेत्र कळघमच्या नेतृत्वाखाली सरकार आहे. या दोन्ही राज्यांमध्ये भाजपला संघटनात्मकदृष्ट्या मोठी उभारणी करावी लागणार आहे. त्यासोबतच या वर्षात आसाम, केरळ, पाँडिचेरी या राज्यांमध्येही विधानसभा निवडणुका होत आहेत. या सर्व निवडणुका नितीन नवीन यांच्यासाठी कठोर परीक्षेच्या ठरणार आहेत. त्यांच्या नेतृत्वाची ही कसोटी ठरणार आहे.*

*सध्याच्या राजकीय परिस्थितीत केंद्रातील सरकार किमान २०२९ पर्यंत स्थिर असल्याचे चित्र आहे. या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मावळते अध्यक्ष व केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा, माजी अध्यक्ष व संरक्षणमंत्री राजनाथ सिंह तसेच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांसारख्या अनुभवी नेत्यांचे मार्गदर्शन नितीन नवीन यांना मिळणार आहे. वरिष्ठ नेत्यांकडून धोरणात्मक दिशा आणि स्थैर्य, तर नव्या अध्यक्षाकडून संघटनात्मक गती आणि नव्या पिढीशी संवाद असा समतोल साधण्याचा प्रयत्न या नेतृत्वबदलामागे असल्याचे मानले जाते.एकूण पाहता नितीन नवीन यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड ही व्यक्तीपेक्षा प्रक्रियेवर विश्वास ठेवणाऱ्या भाजपच्या राजकारणाचे प्रतिबिंब आहे; मात्र नितीन नवीन यांच्यासाठी अध्यक्षपद ही केवळ सन्मानाची जबाबदारी नसून ती एक कठोर राजकीय परीक्षा आहे. जुनी अनुभवी फळी आणि नवीन नेतृत्वाची पिढी यांच्यातील समन्वय साधण्याचा भाजपचा हा प्रयत्न आगामी निवडणुकांत कितपत यशस्वी ठरतो, हे काळच ठरवेल. विरोधकांच्या ताब्यातील राज्यांतील निवडणुका, संघटनात्मक विस्तार आणि नव्या मतदारांशी नाते जोडणे या सर्व बाबींवरूनच नवीन युग ही संकल्पना प्रत्यक्षात कितपत प्रभावी ठरते, याचा निर्णय होणार आहे; मात्र नेतृत्वबदल करताना अनुभवाचा आधार सोडला न जाता नव्या राजकीय वास्तवाशी जुळवून घेण्याचा प्रयत्न भाजपने केला आहे, हे निश्चित!*

# नवीन विहीर योजनेकरीता कोणती कागदपत्रे लागतात, पहा संपूर्ण डाकुमेंट्सची यादी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती**

राज्यातील शेतकऱ्यांसाठी विहिरींसाठी विविध योजना राबवल्या जातात. ज्यामध्ये मागेल त्याला विहीर योजना, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना, डॉ.बाबासाहेब कृषि स्वावलंबन योजनांच्या माध्यमातून विहिरीच्या योजना राबवल्या जातात. त्यापैकी डॉ.बाबासाहेब कृषि स्वावलंबन योजनेतील विहीर योजनेबाबतच्या कागदपत्रांसंदर्भात माहिती घेऊयात...

तर जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्याच्या दृष्टिकोनातून तसेच सिंचनाची शाश्वत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी डॉ.बाबासाहेब कृषि स्वावलंबन योजना ही अनुसूचित जाती / नवबौद्ध शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाच्या कृषि विभागामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेकरिता पुढील कागदपत्रांची आवश्यकता असते.

नवीन विहीरीकरीता आवश्यक कागदपत्रे




१) सक्षम प्राधिकारी यांचेकडील अनुसूचित जातीचे जात प्रमाणपत्र

२) सातबारा व आठ अ चा उतारा

३) उत्पन्न प्रमाणपत्र.

४) लाभार्थीचे प्रतिज्ञापत्र. (१०० रुपये स्टॅम्प पेपर)

५) अपंग असल्यास प्रमाणपत्र

६) तलाठी यांच्याकडील दाखला - सामाईक एकूण धारणा क्षेत्राबाबतचा दाखला (०.४० ते ६ हेक्टर मर्यादेत); विहीर नसल्याबाबत प्रमाणपत्र; प्रस्तावित विहीर पुर्वीपासून अस्तित्वात असलेल्या विहीरीपासून ५०० फूटापेक्षा जास्त अंतरावर असलेचा दाखला; प्रस्तावित विहीर सर्व्हे नं. नकाशा व चतु:सीमा.

७) भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेकडील पाणी उपलब्धतेचा दाखला.

८) कृषि अधिकारी यांची क्षेत्रीय पाहणी व शिफारसपत्र

९) गट विकास अधिकारी यांचे शिफारसपत्र

१०) ज्या जागेवर विहीर घ्यावयाची आहे, त्याजागेचा फोटो (महत्वाची खुणेसह व लाभार्थी सह).

११) ग्रामसभेचा ठराव.




# टोमॅटोचे आरोग्य फायदे काय आहेत?

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक**

टोमॅटो खाल्ल्याने अनेक प्रकारचे आरोग्य फायदे होतात.

टोमॅटोमध्ये असलेले फायबर पचन सुधारण्यास मदत करते.

व्हिटॅमिन सी, अँटीऑक्सिडंट्स रोगप्रतिकारशक्ती मजबूत करतात.

पोटॅशियम रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करते.

टोमॅटोचे नियमित सेवन हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे.

त्यातील जास्त पाणी शरीराला हायड्रेटेड ठेवण्यास मदत करते.

टोमॅटो वजन नियंत्रित ठेवण्यासाठी व त्वचेच्या आरोग्यासाठी फायदेशीर.

अँटीऑक्सिडंटस् फायदेशीर आहेत का?

टोमॅटोमध्ये लाइकोपीन, बीटा-कॅरोटीन व व्हिटॅमिन सी सारखे शक्तिशाली अँटीऑक्सिडंटस् असतात.

ते शरीरातील पेशींना नुकसान



पोहोचवणार्या फ्री रॅडिकल्सना निष्प्रभ करतात.

यामुळे सूज कमी होते, हृदयरोगाचा धोका कमी होऊ शकतो.

लाइकोपीन काही प्रकारच्या कर्करोगाचा धोका कमी करण्यासदेखील मदत करू शकते.

हे अँटीऑक्सिडंटस् त्वचेला अकाली वृद्ध होण्यापासून वाचवतात आणि रोगप्रतिकारशक्ती मजबूत करतात.

# कमी खर्चात कमी कालावधीत चांगल उत्पादन देणारी दोडका, कारले शेती

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक**

दोडका आणि कारल्याची शेती फायदेशीर असून त्यासाठी योग्य जमीन, बियाणे प्रक्रिया, खत व्यवस्थापन आणि मंडप पद्धतीचा वापर आवश्यक आहे. योग्य अंतरावर बियाणे टाकून, बीजप्रक्रिया करून आणि संतुलित खतांचा वापर केल्यास चांगले उत्पादन मिळते


सद्यस्थितीतील दोडका, कारले लागवड

वेलवर्गीय भाजीपाला पिके : दोडका, कारले लागवड

चांगला निचरा होणाऱ्या, भुसभुशीत, मध्यम ते भारी जमिनीची निवड करावी.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

लागवडीपूर्वी शेताची चांगली मशागत करून एकरी ६ टन चांगले कुजलेले शेणखत मिसळावे.

उन्हाळी लागवड जानेवारी ते मार्च महिन्यात करावी.

लागवडीसाठी दोडक्याच्या पुसा नसदार, कोकण हरिता, फुले सुचिता; कारल्याच्या फुले प्रियांका, फुले ग्रीन गोल्ड, फुले उज्वला, हिरकणी, कोकण तारा या सुधारित जातींची निवड करावी.

तसेच बाजारामध्ये खाजगी कंपन्यांचे विविध उत्पादनक्षम वाण उपलब्ध आहेत.

कारले आणि दोडका लागवडीसाठी ताटी पद्धतीचा अवलंब करावा.

पारंपरिक पद्धतीपेक्षा या सुधारित पद्धतीमुळे उत्पादनात वाढ मिळते. लागवडीचे अंतर १.५ ु १ मीटर ठेवावे.

लागवडीसाठी दोडका, कारले या पिकाचे सुधारित वाणांचे ६०० ते ८०० ग्रॅम बियाणे लागते.

पेरणीपूर्वी बियाण्यास २.५ ग्रॅम कार्बेडाझिम प्रति किलो या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी.

माती परीक्षण अहवालानुसार रासायनिक खतांची मात्रा द्यावी.

– ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन सेवा केंद्र, इगतपुरी.

### निवडणुकीसाठी घड्याळ चिन्ह घेण्याच्या आदेशाने संभमावस्था

# जिल्हा परिषदेसाठी घड्याळ चिन्ह घ्या

## शरद पवार राष्ट्रवादीच्या जिल्ह्यातील नेत्यांना आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१कोल्हापूर-** जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष व अजित पवार यांची राष्ट्रवादी एकत्र आल्याने शरद पवार राष्ट्रवादीच्या उमेदवारांना घड्याळ चिन्ह घेण्याचे आदेश राज्यातून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या सर्व जिल्ह्यांतील पदाधिकाऱ्यांना देण्यात आला आहे. महाविकास आघाडीच्या जागा वाटपाच्या चर्चा सुरू असून, शरद पवार राष्ट्रवादीसाठी काही ठिकाणच्या जागा महाविकास आघाडीमध्ये सोडण्यात आल्या असताना हा आदेश आल्यामुळे महाविकास आघाडीच्या नेत्यांसह उमेदवारांमध्ये संभमावस्था निर्माण झाली आहे.महानगर पालिकेच्या निवडणूक निकालानंतर राष्ट्रवादीच्या दोन्ही पक्षांच्या अस्तित्वाबद्दलच शंका उपस्थित करण्यात येऊ लागल्या होत्या. त्यामुळे जिल्हा परिषद व पंचायत




समितीच्या निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादींनी एकत्र लढण्याबाबत गेल्या काही दिवसांपासून चर्चा सुरू होत्या. अखेर शरद पवार व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बैठकीत एकत्र लढण्यावर शिक्कामोर्तब केले.दोन्ही राष्ट्रवादींच्या नेत्यांच्या या बैठका सुरू असतानाच जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी जिल्ह्या जिल्ह्यांमध्ये महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये जागावाटपाच्या चर्चा सुरू होत्या. काही ठिकाणी जागावाटपाच्या चर्चा पूर्ण होऊन शरद पवार यांच्या राष्ट्रवादीसाठी काही ठिकाणच्या जागा सोडण्यात आल्या आहेत. त्यांनी उमेदवारी अर्ज भरताना राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचा उल्लेखही केला आहे.

जर उमेदवारी अर्जावर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचा उल्लेख करण्यात आला असेल, तर या पक्षाचे चिन्ह तुतारी आहे, असे असताना राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या उमेदवारांना घड्याळ चिन्ह घेण्यास सांगण्याचा आदेश पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी जिल्ह्यातील पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना देण्यास सुरुवात केली आहे. उमेदवारी अर्ज भरण्याचा बुधवारी (दि. २१) शेवटचा दिवस आहे. या पार्श्वभूमीवर पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून निवडणूक चिन्हाबाबत देण्यात आलेल्या आदेशामुळे हे उमेदवार महाविकास आघाडीचे समजायचे की महायुतीचे, याबद्दल गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे.

# मराठी भाषा विद्यापीठाच्या पहिल्या परीक्षेस सुरवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

अमरावती अमरावती येथे कार्यरत देशातील पहिल्या मराठी भाषा विद्यापीठाच्या प्रथम सत्राच्या पहिल्या परीक्षेस सोमवार, दि. १९ जानेवारीपासून सुरूवात झाली आहेत. विद्यापीठाच्या स्थापनेनंतरच्या या पहिल्याच परीक्षा असल्याने विद्यार्थी आणि व्यवस्थापनामध्ये आनंदाचे वातावरण आहे. पहिलेच वर्ष असल्याने विद्यापीठाने चार अभ्यासक्रम सुरू केले आहेत. यात कला स्नातक (बी.ए.) भाषा व लिपीशास्त्र, प्रादर्शिक कला स्नातक (बी.पी.ए. नाटक), स्नातकोत्तर मराठी (अभिजात भाषा) आणि स्नातकोत्तर मानसशास्त्र या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. विद्यापिठाचे पहिलेच वर्ष असतानाही ४९ विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमात प्रवेश घेतला. अभ्यागत प्राध्यापकांच्या सहकार्याने प्रथम सत्राचे वर्ग सुरू करण्यात आले. कालपासून या सर्व चार अभ्यासक्रमांच्या पहिल्या सत्राची परीक्षा सुरळीतपणे सुरू झाली आहे. याचा विद्यापीठातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आनंद व्यक्त केला. विद्यापीठाचा प्रारंभ असल्यामुळे




अनेक विद्यार्थ्यांच्या मनात धाकधूक होती, परंतु विद्यापीठ व्यवस्थापनाने तज्ज्ञ अभ्यागत प्राध्यापकांना निमंत्रित करून त्यांच्याकडून अभ्यासक्रम पूर्ण करून घेतला. त्यामुळे विद्यापीठातील विद्यार्थीवर्ग सुखावला असून विद्यापीठाबद्दलचा आत्मविश्वास वाढला आहे. अनेक अडचणी असतानाही विद्यापीठाला एक वर्ष पूर्ण व्हायच्या आतच या चार अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया राबविली. विद्यार्थ्यांनी उत्तम प्रवेशास प्रतिसाद दिला. अभ्यासकांनी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांची मांडणी केली असल्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यकाळात या अभ्यासक्रमांचा निश्चितच उपयोग होणार आहे, अशी भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. पुढील वर्षी नवे अभ्यासक्रम विद्यापीठ सुरू करणार असल्याचे विद्यापीठाच्या कला व साहित्य प्रशालेचे अधिष्ठाता व प्रभारी परीक्षा नियंत्रक डॉ. कोमल ठाकरे यांनी सांगितले.

# महापौरपदासाठी उद्या मुंबईत आरक्षण सोडत

## अमरावतीचा महापौर कोण होणार? इच्छुकांच्या नजरा सोडतीकडे : राजकीय वातावरण तापणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

अमरावती महानगरपालिकेसह राज्यातील २९ महापालिकांच्या महापौर पदासाठीची आरक्षण सोडत गुरुवारी (दि. २२ जानेवारी) मुंबई येथे होणार आहे. या सोडतीकडे सर्वच राजकीय पक्ष, नेते आणि इच्छुक नगरसेवकांच्या नजरा लागून राहिल्या असून सोडतीनंतर राज्यभरात राजकीय हालचालींना वेग येणार आहे. अनेक महापालिकांमध्ये शह-काटशहाचे राजकारण रंगण्याची चिन्हे स्पष्टपणे दिसत आहेत.राज्यातील महापालिकांच्या निवडणुका १५ जानेवारी रोजी पार पडल्या, तर १६ जानेवारीला निकाल जाहीर झाला. त्यानंतर



लगेचच महापौरपदासाठीच्या हालचालींना सुरुवात झाली आहे. यंदा पहिल्यांदाच एकाचवेळी राज्यातील २९ महापालिकांच्या महापौरपदासाठी आरक्षण सोडत काढली जाणार आहे. नगरविकास मंत्रालय, मुंबई येथील सहाव्या मजल्यावर सकाळी ११ वाजता ही सोडतीस प्रारंभ होणार आहे. या सोडतीत कोणत्या महापालिकेत कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षण निघणार, हे स्पष्ट होणार असून त्यानंतर महापौर निवडीचे राजकारण अधिकच तापणार आहे.राज्यभरात सुरू असलेल्या अंतर्गत कुरघोडी, गटबाजी आणि सत्तासमीकरणांमुळे अनेक ठिकाणी अनपेक्षित राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. काही महापालिकांमध्ये महायुतीतील तर काही ठिकाणी महाविकास आघाडीतील अंतर्गत संघर्षातून विरोधकांशी हातमिळवणीचे प्रकार घडताना दिसत आहेत. त्यामुळे महापौर निवडणूक केवळ संख्याबळावर न ठरता राजकीय डावपेचांवर अवलंबून राहणार असल्याचे संकेत आहेत

# विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१ अमरावती**

,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणातर्फे आपत्ती प्रवण शाळांमधील विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे देण्यात येत आहे. जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने आपत्ती प्रवण भागातील शाळेमध्ये शाळा सुरक्षा कार्यक्रम घेण्यात येत आहे. जिल्ह्यातील आपत्तीचे प्रमाण पाहता जीवित हानी टाळण्यासाठी, तसेच आपत्तीची घटना घडल्यास आपत्तीची तीव्रता कमी करण्याकरीता पूर, आग, वीज, भूकंप, रस्ता अपघात यासारख्या घटनांमध्ये काय करावे आणि काय करू नये, याविषयी जनजागृती आणि प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाचे आपदा मित्र आणि अपदा सखी, समुदाय स्वयंसेवक हे प्रशिक्षक म्हणून कार्य करीत आहेत. या प्रशिक्षण कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. प्रशिक्षणात प्रथमोपचार आपत्तीमध्ये उचल पद्धती, आपत्ती म्हणजे काय, आपत्तीमध्ये शासनाची भूमिका याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येत आहे. सदर प्रशिक्षण हे निवासी उपजिल्हाधिकारी यांचे मार्गदर्शनात होत असून जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाळांमधील कार्यक्रमाला उपस्थित राहत आहे. या प्रशिक्षणाला शिक्षकांचे सहकार्य मिळत आहे. तसेच तहसीलदार, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हा शोध व बचाव पथक उपस्थित राहत आहेत.

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. २१ जानेवारी २०२६ शहर/ग्रामिण

# अमरावतीत सत्ता कुणाची? भाजपसमोर गणित कठीण, रवी राणांकडे किल्ल्या



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती :-** महापालिकेच्या निवडणुकीत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळू शकले नाही, त्यातच गेल्या निवडणुकीत ४५ जागा जिंकणाऱ्या भाजपची २५ जागांवर घसरण झाली. मित्रपक्ष असलेल्या युवा स्वाभिमान पक्षाने ३ वरून १५ जागांवर घेतलेली झेप ही भाजपच्या नेत्यांसाठी झोप उडवणारी ठरली. ८७ सदस्यीय महापालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी ४४ सदस्यांची गरज आहे. भाजप, युवा स्वाभिमानसह राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे ११ आणि शिवसेना शिंदे गटाचे ३ सदस्य मिळून सहजपणे महायुतीची सत्ता स्थापन होऊ शकते. पण, नेत्यांमधील संघर्षामुळे सत्तास्थापनेच्या मार्गात अडथळे निर्माण झाले आहेत. सध्या तरी सूत्रे ही युवा स्वाभिमान पक्षाचे अध्यक्ष रवी राणा यांच्याकडे एकवटली आहेत.

आमदार रवी राणा आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते आमदार संजय खोडके यांच्यातून विस्तव जात नाही. रवी राणा सत्तेत असतील, तर राष्ट्रवादी भाजपला मदत करणार नाही, असे संजय खोडके यांनी स्पष्टपणे जाहीर करून भाजपची कोंडी केली आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादीविना अन्य पक्षांच्या आठ सदस्यांना सोबत घेऊन भाजप आणि युवा स्वाभिमानची सत्ता स्थापन होणार, असा दावा रवी राणा यांनी केला आहे. हे पक्ष कोण, याची चर्चा सुरू झाली आहे. उर्वरित पक्षांमध्ये काँग्रेस १५, एमआयएम १२, बसप ३, शिवसेना ठाकरे गट २, वंचित बहुजन आघाडी १ आणि अशी सदस्यसंख्या आहे. काँग्रेसनेही सत्ता स्थापन करण्याचा दावा केला आहे. सत्तासमीकरणात या पक्षांची गोळाबेरीज महत्वाची ठरणार आहे.

### भाजपमध्ये नाराजीचे सूर

समाधानकारक कामगिरी न झाल्याने भाजप वर्तुळात अस्वस्थता आहे. अनेक पदाधिकाऱ्यांनी तिकीट वाटपापासून ते प्रचार यंत्रणेपर्यंत आम्हाला विश्वासात घेतले गेले नाही, अशा तक्रारी थेट प्रसार माध्यमांसमोर केल्या. काही पराभूत उमेदवारांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून माजी खासदार नवनीत राणा यांची पक्षातून हकालपट्टी करावी अशी मागणी केली. राणा दाम्पत्याने आमच्या विरोधात प्रचार केल्याने पराभव झाला, असा नाराजीचा सूर होता. त्यापैकी अनेकांनी आता घुमजाव केले आहे. पत्रावर आम्ही स्वाक्षरी केली नाही. दिशाभूल करून स्वाक्षरी घेतली गेली.नाराज पराभूत उमेदवारांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी भाजपची समिती अमरावतीत येणार असल्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जाहीर केले. यावेळी प्रचारादरम्यानच्या चित्रफितींचे पुरावे सादर करण्याची तयारी राणा विरोधी गटाने केली आहे. तर राणा समर्थक पडझडीसाठी काही स्थानिक पदाधिकाऱ्यांना जबाबदार ठरवण्याच्या प्रयत्नात आहेत. मात्र, या घडामोडींमध्ये सत्ता स्थापनेच्या हालचाली काहीशा थंडावल्याचे दिसून येत आहे.

# पक्ष ताब्यात घेण्यासाठीच हा घाट!

## प्रविण पोटे यांचा अफवांवर घणाघात



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती,.** १३भाजपमधील अंतर्गत घमासान आता अफवांच्या पातळीवर पोहोचले असून,मंगळवारी दुपारी सोशल मीडियावर प्रविण पोटे यांनी राजीनामा दिल्याची अफवा जोरदारपणे पसरवण्यात आली. मात्र प्रविण पोटे मित्र परिवाराने या अफवेचा स्पष्ट शब्दात नकार दिला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भाजपमधील अंतर्गत वाद दिवसेंदिवस वाढत चालला आहे. एकीकडे तिकीट वाटपावरून कोअर कमिटीवर थेट निशाणा साधला जात असताना, दुसरीकडे प्रविण पोटे यांना आमदार दाम्पत्याचे निकटवर्तीय ठरवून सोशल मीडियावर पोस्ट व्हायरल केल्या जात आहेत. हे प्रकरण शांत होत नाही तोच, आज प्रविण पोटे यांच्या राजीनाम्याची अफवा पुन्हा एकदा वेगाने पसरली.ही बातमी व्हायरल होताच या बातमीची सत्यता जाणून घेण्यासाठी प्रविण पोटे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, मला पक्षातील ज्येष्ठ नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, प्रदेशाध्यक्ष चव्हाण तसेच इतर नेत्यांवर पूर्ण विश्वास आहे. पक्षातील कार्यकर्त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मी नेहमीच एकत्रित प्रयत्न करत आलो आहे.

पुढे बोलताना त्यांनी ठाम शब्दांत सांगितले की, ज्यांना पक्ष ताब्यात घ्यायचा आहे, तेच अशा प्रकारच्या अफवा पसरवत आहेत. मी भाजपचा निष्ठावान कार्यकर्ता होतो, आहे आणि कायम राहीन. असे स्पष्ट मत भाजप नेते प्रविण पोटे यांनी व्यक्त केले.

या घटनेमुळे भाजपमधील अंतर्गत कलह पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. या संदर्भात पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने लवकरात लवकर ठोस निर्णय घेतला नाही, तर अशा घडामोडी पक्षाच्या प्रतिमेला मारक ठरण्याची आणि कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# उपचारादरम्यान १८ वर्षीय मंथन देशमुखचा मृत्यू

## दोषी वाहनचालकाच्या अटकेसाठी तिवसा पोलीस ठाण्यावर नागरिकांचा जमाव






**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती** तिवसा शहरालगत असलेल्या राष्ट्रीय महामार्गावरील वनी फाटा येथे बुलेरो कार व दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण अपघातात अखेर एका निष्पाप युवकाचा बळी गेला. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या मंथन बबन देशमुख (वय १८, रा. वणी) यांचा अमरावती येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना मृत्यू झाला. या घटनेमुळे वणी व तिवसा परिसरात शोककळा पसरली आहे.ही दुर्दैवी घटना दि. १७ जानेवारी रोजी दुपारी डिड वाजताच्या सुमारास घडली होती. वनी फाटा येथे दुचाकीवरून जात असताना नागपूरकडून भरधाव वेगात येणाऱ्या बुलेरो कारने दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील श्रीकांत सुधीर देशमुख (वय ३५) यांच्या पायाला, तर मंथन देशमुख यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ मदतकार्य करत दोन्ही जखमींना तिवसा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र मंथन देशमुख यांची प्रकृती अत्यवस्थ असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अमरावती येथील रीम्स हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. उपचार सुरू असतानाच मंगळवार दि. २० जानेवारी २०२६ रोजी प्राणज्योत मालवली.या घटनेनंतर संतप्त झालेल्या वणी येथील नागरिकांनी कुटुंबीयांसह मोठ्या संख्येने तिवसा पोलीस स्टेशनमध्ये धडक देत. अपघातास कारणीभूत ठरलेल्या बुलेरो चालकावर तात्काळ कारवाई करून अटक करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. आरोपी चालकास अटक होईपर्यंत मृतदेह ताब्यात न घेण्याची ठाम भूमिका ग्रामस्थांनी यावेळी घेतली. दरम्यान मृतदेह रुग्णवाहिकेद्वारे पोलीस स्टेशनमध्ये आणण्यात आला होता.या आंदोलनामुळे काही काळ तिवसा पोलीस स्टेशन परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. तालुक्यातील तसेच वणी येथील मोठ्या संख्येने ग्रामस्थ घटनास्थळी जमा झाले होते.या दुर्दैवी घटनेमुळे देशमुख कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, मंथनच्या अकाली मृत्यूमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहेत.

> तिवसा शहरालगत वणी फाटा येथे झालेल्या अपघातादरम्यान वाहन चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंदर्भात अधिक तपास तिवसा पोलीस स्टेशन अंतर्गत सुरू आहे.
> **आधारसिंग सोनोने,** प्रभारी पोलीस निरीक्षक तिवसा.

# शिरजगाव मोझरीत नऊ महिन्यात २७ मृत्यू

## पॅरेलिसिस, ब्रेन हॅमरेज व इतर दुर्धर आजाराबाबत सर्वेक्षण होणार!



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२शिरजगाव मोझरी–** कॅन्सर, हार्ड अटॅक आणि पॅरेलिसिसच्या रुग्णांची संख्या शिरजगाव मोझरी गावात रुग्णांची संख्या वाढली आहे. गेल्या वर्षी एप्रिल ते ३१ डिसेंबर या ९ महिन्यात विविध प्रकारातील तब्बल २७ मृत्यू झाल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली. तर एकट्या जानेवारी महिन्यात सुमारे ६ मृत्यू झाल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले यांच्याकडे तक्रार केली होती. त्यावरून तालुका आरोग्य अधिकारी आणि जिल्हा आरोग्य विभागाच्या पथकाने गावात भेट देऊन नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी नागरिक नागरिकांकडून शिरजगाव मोझरी उपकेंद्रात बीपी, शुगर चाचणी मशीनची मागणी केली. तर गावातील वाढत्या मृत्यूच्या संख्येमुळे सुद्धा नागरिकांनी यावेळी चिंता व्यक्त केली. शिवाय गावातील पिण्याच्या पाण्याचे स्रोतामधील पाण्याचे नमुने सुद्धा चाचणीची मागणी केली. तर ज्या घरी कॅन्सर, पॅरेलिसिस आणि हार्ड आजाराच्या अटॅक रुग्ण आहे. त्यांच्यासह स्थानिक नागरिकांचेही विविध आरोग्य तपासण्या करण्याची मागणी केली. शिवाय, सिकलसेल चाचणीसाठी किट्सची संख्या वाढवण्याची मागणी सुद्धा यावेळी अधिकाऱ्यांपुढे नागरिकांनी केली. त्यावरून जिल्हा आणि तालुका स्तरावरून आलेल्या ९ अधिकारी कर्मचाऱ्यांच्या पथकाने पाहणी दौऱ्यात कुटुंबनिहाय सर्वेक्षण करण्यात येईल, विविध आजारांनी मृत्यूच्या पार्श्वभूमीवर विशेष मोहीम स्वरूपात आरोग्य कर्मचारी व सर्व आशा मार्फत सर्वेक्षण घेण्यात येईल.

### मृत्यूची कारणे आणि आकडेवारी

- वयोवृद्ध – १०
- अस्थमा – २
- पॅरिलेसिस ४
- टीबी १
- कॅन्सर – २
- लिव्हर – ३
- हार्ट अटॅक – २
- ब्रेन हॅमरेज – १
- मनोरुग्ण १

> **शिरजगाव मोझरी उपकेंद्रातील डॉक्टर, एएनएम आणि इतर कर्मचारी अधिकाऱ्यांना इतर गावातील प्रभार दिले आहे. गावची सुमारे लोकसंख्या ५ हजार पेक्षा जास्त आहे. अशा परिस्थितीत रात्रीचा आरोग्याचा प्रश्न उपस्थित झाल्यास अमरावती शिवाय पर्याय नाही. त्यामुळे तातडीने उपकेंद्रातील डॉक्टरांसह संपूर्ण आरोग्य कर्मचाऱ्यांना नियमित मुख्यालयी नियुक्ती द्यावी.**

# शासनाच्या उदासीनतेमुळे मेळघाटातील मका शेतकरी आर्थिक संकटात



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अचलपूर–** मेळघाट आणि अचलपूर परिसरातील आदिवासी व अन्य समाज बांधवांनी शासनाला मका पीक विकून आता दोन महिन्यांचा कालावधी उलटला आहे. मात्र, अद्याप या पिकाचा मोबदला शेतकऱ्यांच्या पदरात पडलेला नाही. हक्काचे पैसे मिळत नसल्याने या भागातील शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला असून, मका पिकाचे चुकारे केव्हा मिळणार, असा संतप्त सवाल शेतकरी विचारत आहेत.या गंभीर समस्येबाबत मेळघाटचे सामाजिक कार्यकर्ते व गाभा समिती सदस्य ॲड. बंड्या साने यांनी शासनाचेलक्ष वेधले आहे. त्यांनी यासंदर्भात थेट मुख्यमंत्री, राज्यपाल आणि मुख्य सचिवांसह अनेक वरिष्ठ विभागांना लेखी पत्र पाठवून शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या आहेत. हमीदराने शासन खरेदीसुरु करण्यासाठी मेळघाटातील सामाजिक कार्यकर्त्यांसह शेतकऱ्यांनी लढा दिला होता. त्यानंतर मक्याची खरेदी सुरु झाली होती. हे येथे उल्लेखनीय.

### प्रशासकीय दिरंगाईने आदिवासी शेतकरी त्रस्त

शासकीय खरेदी केंद्रावर मका दिल्यानंतर ठरावीक काळात पैसे मिळणे अपेक्षित असते. मात्र, दोन महिने झाले तरी आदिवासी विकास महामंडळ किंवा संबंधित विभागाकडून पेमेंट मिळालेले नाही. मेळघाटातील गरीब शेतकरी या पैशांवरच आपल्या पुढच्या हंगामाचे नियोजन आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून असतो. मात्र, प्रशासनाच्या दिरंगाईमुळे शेतकऱ्यांना कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत.

# तीन वर्षांनंतर सोयाबीन पाच हजारी; वाढलेल्या भावांचा खरा लाभ कुणाला?

## ७५ टक्के शेतकऱ्यांकडे साठवणूकच नाही



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती** :तीन–साडेतीन वर्षांपासून मंदीच्या गर्तेत अडकलेल्या सोयाबीन दराने अखेर उसळी घेतली आहे. जिल्ह्यासह राज्यातील बाजारपेठांमध्ये सोयाबीनचे दर ५,१०० ते ५३०० रुपये प्रतिक्विंटलवर पोहोचले आहेत. तीन वर्षांनंतर पहिल्यांदाच सोयाबीनने पाच हजारांचा टप्पा ओलांडल्याने बाजारपेठेत तेजीचे वातावरण आहे.

हमीभाव योजनेंतर्गत 'नाफेड'कडून जिल्ह्यात १६ केंद्रांवर सोयाबीन खरेदी केंद्र सुरू आहे. येथे ५,३२८ रुपये प्रतिक्विंटल या हमीभावाने सोयाबीन खरेदी करण्यात येत आहे. मात्र, खासगी बाजारात सोयाबीनच्या दराने उसळी घेतल्याने हमीभाव खरेदी केंद्राकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरविली आहे.

नाफेड आणि खासगी व्यापाऱ्यांचे दर १०० ते २०० रुपयांचे दरम्यान कमी–अधिक आहे. त्यामुळे केंद्रापेक्षा खासगी बाजारात शेतकरी आपला माल आणत आहेत. अशा परिस्थितीत 'डीओसी'ची मागणी वाढली, शिवाय सरकी देखील महागली. त्यामुळे सोयाबीनला उठाव आला. अमेरिका, ब्राझील आणि अर्जेंटिना या प्रमुख सोयाबीन उत्पादक. देशांमध्ये हवामानातील बदल, उत्पादन अंदाजात घट आणि निर्यातीवरील मर्यादा यामुळे जागतिक बाजारात दर वाढल्याचे बोलले जात आहे.

### शेतकऱ्यांकडील सोयाबीन संपल्यावर झाली दरवाढ

आर्थिक अडचणीमुळे ७० ते ७५ टक्के शेतकऱ्यांनी सोयाबीन आधीच विकून टाकले आहे. आता केवळ मोठ्या शेतकऱ्यांकडे थोडाफार साठा शिल्लक असताना दरवाढ झालेली आहे.

# रेल्वेच्या समिक्षा बैठकीला ९ पैकी ६ खासदारांची दांडी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१नागपूर–** वर्षाला हजारो कोटींचे उत्पन्न देणाऱ्या आणि महाराष्ट्रासह मध्यप्रदेश तसेच छत्तीसगडपर्यंत विस्तारलेल्या दक्षिण पूर्व मध्य (दपूम) रेल्वेच्या कार्यक्षेत्रातील कामांची समिक्षा बैठक आज पार पडली. मात्र, या बैठकीला कार्यक्षेत्रातील ९ पैकी ६ खासदार महोदयांनी दांडी मारली. केवळ तीनच खासदार या बैठकीला प्रत्यक्ष उपस्थित राहिले.दक्षिण पूर्व मध्य रेल्वेचे कार्यक्षेत्र तीन राज्यात विस्तारलेले आहेत. एकूण ३२४ रेल्वे स्थानके असून या ठिकाणांहून ९६२ गाड्यांचे रोज संचलन केले जाते. प्रवासी आणि मालवाहतुकीतून दपूम रेल्वेला रोज कोट्यवधींचा महसूल मिळतो. कामकाजाचे सुलभीकरण आणि संचलन करण्यासाठी दपूमची नागपूर, बिलासपूर आणि रायपूर या तीन ठिकाणी स्वतंत्र विभागीय कार्यालये आहेत. एकट्या नागपूर विभागाचा विचार केल्यास सुरू असलेल्या आर्थिक वर्ष २०२५–२६ मध्ये केवळ २८७ दिवसांत एकट्या मालवाहतुकीतून २३ हजार, ६५५ कोटींचा महसूल नागपूर विभागाला मिळाला आहे. यावरून येथील आर्थिक उलाढालीची प्रचिती यावी. सध्य स्थितीला या तीन विभागात अमृत भारत स्टेशन योजनेसह रेल्वेच्या वेगवेगळ्या योजनांची हजारो कोटींची कामे सुरू आहेत.

# काम न करणाऱ्यांची बदली अटळ? राकेश ओलांचा सज्जड इशारा

## पोलीस आयुक्तांनी घेतला अडीच तास गुन्हेविषयक आढावा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती –** जो काम करणार नाही, त्याची तत्काळ बदली करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा पोलीस आयुक्तांनी मंगळवारी गुन्हे विषयक आढावा बैठकीत दिला. तिन्ही उपायुक्तांसह एसीपी आणि आयुक्तालयातील १० ठाणेदार, व वेगवेगळ्या शाखेतील वरिष्ठ अधिकारी उपस्थीत होते.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी १५ डिसेंबर रोजी अमरावती शहर पोलीस आयुक्त पदाचा पदभार सांभाळल्यानंतर प्रथम सर्व अधिकाऱ्यांची ओळख करून घेतली आणि मनपा निवडणूका असल्याने त्यांनी शहरातील सर्व अवैध

धंदा चालकांना पेशीत बोलावून यापूढे शहरात कुठल्याच प्रकारचा अवैध धंदा दिसणार नाही, असे बजावले होते. त्यानंतर प्रत्येक ठाण्याची पाहणी करून तेथील कामकाजाचा आढावा घेत गुन्हेगारांबाबत सखोल माहिती घेत मनपा निवडणूकीदरम्यान कुठल्याही प्रकारचा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, याबाबात विशेष आदेश दिले होते.

परिणामी मनपा निवडणूक शांततेत पार पडली.

मंगळवारी पोलीसआयुक्तांनी आयुक्तालयातील सर्व अधिकाऱ्यांची क्राईम बैठक घेतली. या दरम्यान त्यांनी स्पष्ट सांगितले की, मोठ्या प्रमाणात गुन्हे पेंडींग आहेत. दैनदिन कामासह पेंडीग गुन्ह्याची निर्गती करा.

शहरात दिवसाला व रात्रीला पोलीस सतत रस्त्यावर दिसले पाहिजे, या पध्दतीने शहरात २४ तास पेट्रोलिंग करावी तसेच प्रत्येक ठाण्यातील सर्व प्रकारच्या गुन्हेगारांची यादी करून त्यांच्यावर कुठली कारवाई करण्यात आली आणियापूढे त्याच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात यावी, याबाबत नव्याने आदेश दिले. शहरात सर्व प्रकारचे अवैध धंदे ज्या पध्दतीने बंद आहेत त्याच प्रमाणे ते कायमस्वरुपी बंद असावे, कोणत्याही पोलीस ठाण्यांतर्गत अवैध धंदे सुरू दिसले किंवा कोणता अधिकारी पाहिजे त्या प्रमाणे काम करत नसेल तर संबंधित अधिकाऱ्यांची तत्काळ बदली करण्यात येईल, असा सतर्कतेचा इशारा पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी दिला आहे.

# विजय वडेट्टीवारांनी नगरसेवक उचलून नेले, आम्ही राजीनामे देऊ

## खासदार प्रतिभा धानोरकर भडकल्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१चंद्रपूर** चंद्रपूर महापालिकेत काँग्रेसने भाजपाला धोबीपछाड देत सर्वात मोठा पक्ष म्हणून मुसंडी मारली. पण, बहुमतापर्यंत पोहोचू शकला नाही. त्यामुळेच चंद्रपुरातील राजकारण रंगलं आहे. एकीकडे भाजपाकडूनकाँग्रेसचे नगरसेवक फोडण्यासाठी ऑपरेशन लोटस सुरू केले आहे, तर दुसरीकडे काँग्रेसमध्येच वादाचा भडका उडाला आहे. विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्यातच संघर्षाची ठिणगी पडली असून, धानोरकरांनी थेट राजीनामे देण्याचाच इशारा दिला



आहे. खासदार प्रतिभा धानोरकर यांनी पक्षाचे नेते आमदार विजय वडेट्टीवार यांच्यावर घणाघाती हल्ला केला. धानोरकर म्हणाल्या की, खरंतर विजय वडेट्टीवार यांनी काँग्रेसचे ३० नगरसेवक निवडून आल्यानंतर सत्ता स्थापनेचा प्रयत्न करायचा होता. पण, त्यांनी नगरसेवकांना घरातून उचलून गटबाजी सुरू केली आहे. असे करायला नको होते. त्यामुळे उर्वरित नगरसेवक सुरक्षित रहावे म्हणून आम्ही त्यांना हॉटेलला हलवले आहे, असा गंभीर आरोप प्रतिभा धानोरकर यांनी विजय वडेट्टीवार यांच्यावर केला आहे.

चंद्रपूर हा माझा लोकसभा मतदारसंघ आहे. त्यांनी माझ्या मतदारसंघात ढवळाढवळ करू नये ही आमची मागणी आहे. नाहीतर उद्याला आम्ही त्यांच्या ब्रह्मपुरी विधानसभा मतदारसंघात ढवळाढवळ करू, असा इशारा खासदार प्रतिभा धानोरकर यांनी विजय वडेट्टीवार यांना दिला आहे.

आमची मागणी मान्य केली नाही, तर पक्षाला आमची गरज नसेल तर आम्ही सामूहिक राजीनामा देऊ, असा संताप धानोरकरांनी व्यक्त केला आहे.


### चंद्रपूरमध्ये सत्ता स्थापनेचा गुंता काय?

चंद्रपूर महापालिका निवडणुकीत भाजपाचे २४ नगरसेवक जिंकून आले आहेत. तर काँग्रेसचे २७ नगरसेवक निवडून आले आहेत. महापालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी ३४ नगरसेवकांचे बहुमत आवश्यक आहे. मात्र, काँग्रेसला अजूनही चार नगरसेवकांची गरज आहे. उद्धवसेनेचे ६ नगरसेवक जिंकून आले असून, त्यामुळे उद्धवसेना किंगमेकर ठरली आहे. उद्धवसेनेला सोबत न घेता काँग्रेस नगरसेवकांचाच गट सोबत घेण्याचा प्रयत्न भाजपाचा आहे. सुधीर मुनगंटीवार यांनीच त्याबद्दल माहिती दिली आहे. तर काँग्रेसमध्ये आपसातच वाद लागला आहे.

# ६८ उमेदवारांना २०० पेक्षाही कमी मते

## मनपा निवडणुकीत धक्कादायक आकडे

### मतविभाजन ठरले निर्णायक



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती –** अमरावती महापालिकेच्या निवडणूक निकालांनी शहराच्या राजकारणात अनेक अनपेक्षित व धक्कादायक बाबी समोर आणल्या आहेत. गुंतागुंतीची राजकीय समीकरणे, मोठ्या प्रमाणावर अपक्ष – उमेदवार आणि प्रचंड मतविभाजन यामुळे ही निवडणूक अत्यंत चुरशीची ठरली. मात्र निकालांचे विश्लेषण करता एक महत्त्वाची बाब समोर आली असून, तब्बल ६८ उमेदवारांना २०० मतांचाही –टप्पा पार करता आलेला नाही.

काही उमेदवारांना केवळ ४० ते ५० मते मिळाल्याने त्यांच्या राजकीय ताकदीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सातही झोनचेआकडे पाहता अनेक उमेदवारांना अपेक्षित जनसमर्थन मिळाले नसल्याचे स्पष्ट होते.

झोननिहाय २०० पेक्षा कमी मते मिळालेल्या उमेदवारांची संख्या झोन क्र. एक –११ उमेदवार, झोन क्र. दोन१२ उमेदवार, झोन क्र. तीन–१२ उमेदवार, झोन क्र. चा १९ उमेदवार, झोन क्र. पाच– चार उमेदवार, झोन क्र. सहा – एकही उमेदवार नाही, झोन क्र. सात–१० उमेदवार.

### राजकीय पक्षांसमोर आत्मपरीक्षणाची वेळ

एकूणच या आकडेवारीतून मतांचे मोठ्या प्रमाणावर झालेले विभाजन, अपक्ष उमेदवारांची संख्या आणि स्थानिक पातळीवरील समीकरणे यांचा फटका अनेक उमेदवारांना बसल्याचे दिसून येते. २०० मतांचाही टप्पा पार न करणाऱ्या ६८ उमेदवारांमुळे शहराच्या राजकारणात नवी चर्चा सुरू झाली आहे.

# ई-केवायसी करताना झालेल्या चुका दुरुस्त करण्याबद्दल

## अदिती तटकरेंचे महिलांना आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१मुंबई**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या ऑनलाइन ई-केवायसी प्रक्रियेने राज्यभरात महिलांची डोकेदुखी वाढवली. त्यातच जानेवारी महिन्यात अनेक महिलांना पैसेच मिळाले नाही. ई-केवायसी करताना त्रुटी राहिल्यामुळे पैसे जमा झाले नसल्याचे समोर आले आहे. महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांनी आता ई-केवायसी करताना झालेल्या चुका दुरूस्त करण्याबद्दल राज्यातील महिलांना माहिती दिली.

अदिती तटकरे यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्रातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी, त्यांच्या आरोग्य व पोषणामध्ये सुधारणा करण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबवण्यात येत आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व लाभार्थ्यांना दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी पर्यंत श-घधउ करण्याची मुदत देण्यात आली होती. पुढे अदिती तटकरे यांनी यांनी सांगितले की, तथापि, काही कारणास्तव श-घधउ करताना चुकीचा पर्याय निवडण्याची बाब निदर्शनास आली आहे. म्हणूनच, योजनेच्या निकषांनुसार या लाभार्थी महिलांची क्षेत्रीय स्तरावर अंगणवाडी सेविकांमार्फत प्रत्यक्ष पडताळणी करण्याच्या सूचना राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती तटकरे यांनी दिली.




जानेवारी महिन्यात लाडकी बहीण योजनेचा हप्ता जमा करण्यात आला. मात्र अनेक महिलांच्या खात्यात पैसेच जमा झाले नाहीत. त्यामुळे ठिकठिकाणी आता महिला आंदोलन करत आहेत. अर्ज भरताना तांत्रिक प्रश्नांच्या अज्ञानामुळे हजारो पात्र महिलांचे अर्ज फेटाळले गेले आहेत. परिणामी, नियमित हप्ते मिळणाऱ्या अनेक महिलांचा लाभ अचानक बंद झाला आहे.एकदा अर्ज सबमिट केल्यानंतर किंवा ई-केवायसी पूर्ण झाल्यावर त्यात झालेली चूक सुधारण्यासाठी पोर्टलवर कोणताही एडीट किंवा करेक्शनचा पर्याय देण्यात आलेला नव्हता. ही सर्वात मोठी तांत्रिक अडचण ठरली असून, चुकीच्या माहितीमुळे एकदा अपात्र ठरलेली महिला कायमची लाभापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे.

# खवय्यांची चंगळ असलेली बहिरम यात्रेचा उत्साह शिगेला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१चां.बाजार–** अमरावती जिल्ह्यातील चांदूरबाजार तालुक्यात सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश सीमेवर भरणारी बहिरमची यात्रा ही महाराष्ट्रातील सर्वात मोठी यात्रा म्हणून प्रसिद्ध आहे. ५ डिसेंबर ते ५ फेब्रुवारी अशी दोन महिने ही यात्रा चालते. विशेष म्हणजे, आता दीड महिना उलटला असतानाही बहिरम यात्रेतील गर्दी, उत्साह आणि आनंद शिगेला पोहोचला आहे. श्रद्धा, परंपरा, संस्कृती यांचा संगम आणि खवय्यांची चंगळ असलेली ही यात्रा विदर्भाच्या लोकजीवनाशी घट्ट नाळ जोडून आहे.

सातपुडा पर्वताच्या टोकावर असणाऱ्या मंदिरात भैरवाची अकरावी करा आकारातली मूर्ती ही या ठिकाणी नजरेत भरणारी. भैरव बाबा हे बहिरम बाबा म्हणून या ठिकाणी ओळखले जातात. फार पूर्वीपासून मेळघाटातील आदिवासी बांधव घनदाट जंगलात असणाऱ्या बहिरम बाबाच्या दर्शनासाठी येतात. काळाच्या ओघात या यात्रेला सामाजिक स्वरूप लाभलं. सुमारे दीड दोनशे वर्षांपूर्वी ही यात्रा शेतकऱ्यांची यात्रा म्हणून ओळखली जाऊ लागली. शेतीची कामं आटोपल्यानंतर शेतमाल विकून हाती आलेल्या पैशातून शेतकरी बांधव बहिरम यात्रेत सहभागी होत असत. शेतीसाठी लागणारी अवजारं, व्यवहार आणि अनेकांची लग्न जुळण्याचं केंद्र म्हणून या यात्रेला महत्त्व होतं. आजही बहिरमची



यात्रा केवळ अमरावती जिल्हापुरती मर्यादित न राहता संपूर्ण विदर्भासाठी जिव्हाळ्याची आहे. मागील काही वर्षात मराठवाडा आणि खानदेशातूनही मोठ्या संख्येनं भाविक इथं येऊ लागलेत.बहिरम यात्रेचं एक आकर्षण म्हणजे मातीच्या हंडीत शिजवलेलं मटण. हंडीतून मटण शिजवून देणारी ६० ते ७० हॉटेल यात्रेच्या परिसरात आहेत. अनेक खवय्ये स्वतः मटण आणून हॉटेल वाल्यांना देतात आणि ते हंडीत शिजवून घेतात. काही ठिकाणी थेट हॉटेलमध्येच हंडीतलं मटण उपलब्ध असतं. काहीजण लगतच्या जंगल परिसरात स्वतः हंडीमध्ये पारंपारिक पद्धतीनं मटण शिजवण्याचा आणि मटण चाखण्याचा आनंद घेतात. मटणासोबतच रोडगे पार्टी करण्यासाठी देखील अनेक जण बहिरमच्या यात्रेत येतात.

बहिरमची यात्रा म्हणजे केवळ धार्मिक विधी नव्हे तर कुटुंबीयांसोबतचा आनंदोत्सव आहे. लहान मुलांपासून तरुण आणि वृद्धांपर्यंत सर्वांसाठी यात्रेत काहीना काही खास आहे. अनेक कुटुंब एकत्र येऊन कोणी रोडगे, तर कोणी बटाटे वांग्याची भाजी तर काहीजण हंडीतल्या मटणाची चव चाखत स्नेहभोजनाचा आनंद घेतात.

## भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष होताच नितीन नबीन यांचे पहिले निर्णय

# विनोद तावडे, आशिष शेलारांवर मोठी जबाबदारी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१नवी दिल्ली–** भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी अखेर नितीन नबीन यांची निवड करण्यात आली आहे. भाजपकडून १६ जानेवारीपासून राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या




निवडीसाठी कार्यक्रम सुरू झाला होता, त्यानुसार आज अर्ज नामांकनप्राप्त आणि पाठिंब्याच्या जोरावर नितीन नबीन ३७ सेटसह भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष बनले आहेत. भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर नितीन नबीन यांनी पहिले महत्वाचे निर्णय घेतले आहेत. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष झाल्यावर नितीन नबीन यांनी पहिल्याच निर्णयात विनोद तावडे, आशिष शेलार यांना दोन जबाबदाऱ्या सोपवल्या आहेत.केरळ विधानसभा निवडणुकीसाठी विनोद तावडेंची प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नितीन नबीन यांनी केरळसाठी विनोद तावडे यांच्यासह शोभा करंदलाजे सहप्रभारी म्हणून निवड केली आहे. तसेच चंदीगड महापौर निवडणुकीसाठी विनोद तावडे यांना प्रभारी म्हणून नियुक्त केले आहेत. तर बंगळूर महापौर पदाच्या निवडणुकीची जबाबदारी राम माधव , सतीश पुनिया आणि संजय उपाध्याय यांच्यावर असणार आहे. तसेच मंत्री आणि मुंबईतील भाजपचे नेते आशिष शेलार यांची तेलंगणाच्या स्थानिक स्वराज्य संस्थेत निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती केली आहे.

# तोडलेल्या झाडांच्या मोबदल्यात लावलेल्या झाडांची गणना करा

## हायकोर्टाने दिले आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१नागपूर**



शहरामधील विविध विकास प्रकल्पांकरिता तोडण्यात आलेल्या जुन्या झाडांच्या मोबदल्यात लावलेल्या नवीन झाडांची गणना करा आणि दोन महिन्यांत अहवाल सादर करा, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्यानागपूर खंडपीठाने सोमवारी महानगरपालिकेचे वृक्ष संरक्षक व जनहित याचिकाकर्त्यांना दिले.

न्यायमूर्तीद्वय अनिल किलोर व राज वाकोडे यांच्यासमक्ष सुनावणी झाली. शहरातील झाडांचे संरक्षण करण्यासाठी प्रीती पटेल, कुणाल तांबूळकर, दिनेश शिंदे व यश नेटके या जागृत नागरिकांनी जनहित याचिका दाखल केली आहे.

मेयो रुग्णालय, सुपरस्पेशालिटी रुग्णालय, पाचपावलीतील ई-लायब्ररी, जिल्हाधिकारी कार्यालय, विभागीय क्रीडा संकुल मानकापूर, बेसा पॉवर हाऊस, इंदोरा ते दिघोरी उड्डाणपूल, सरकारी आयुर्वेदिक महाविद्यालय आदी ठिकाणच्या विकासकामांसाठी एकूण १ हजार ३४७ झाडे तोडणे प्रस्तावित होते. आतापर्यंत त्यापैकी अनेक झाडे तोडण्यात आली आहेत. त्या मोबदल्यात नवीन झाडे लावण्यात आली आहेत. त्या झाडांची संख्या नियमानुसार आहे का, हे वृक्ष संरक्षक व याचिकाकर्त्यांना तपासून पाहायचे आहे. याचिकाकर्त्यातर्फे ॲड. मृणाल चक्रवर्ती, तर मनपातर्फे ॲड. जेमिनी कासट यांनी कामकाज पाहिले.

**जिल्ह्यातील वनक्षेत्र घटले**

नागपूर जिल्ह्यातील वनक्षेत्र २०२१ पासून ३.२ टक्क्यांनी कमी झाले आहे. या परिस्थितीत झाडांचे संरक्षण करणे व एकही झाड अवैधपणे तोडले जाणार नाही हे सुनिश्चित करणे आवश्यक आहे, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे.

# नागपुरात पेट्रोल पंप चालकाच्या घरातून १ कोटीचे हिरे:२४७ तोळे सोने चोरीला

## ६५ लाख रोख रकमेसह एकूण २.९१ कोटींवर चोरट्यांनी केला हात साफ

**विदर्भ प्रजसत्ताक दि.२१नागपूर–** शहरात पेट्रोल पंप चालकाच्या बंगल्यातून अज्ञात चोरट्याने लाखो रुपयांची रोकड, हिरे,सोन्याचे दागिने चोरून नेले आहेत. विशेष म्हणजे सीसीटीव्ही झाकून ही चोरी झाल्याचे दिसून आले. चोरट्याने ६५ लाख रोख, १ कोटी रुपयांचे हिरे व २४७ तोळे सोन्यावर हात साफ केला आहे.

शिर्के लेआऊट येथील रहिवासी बलजिंदरसिंग इंद्रजितसिंग नय्यर (५६) आणि त्यांचा भाऊ शहरात पेट्रोल पंप व इतर व्यवसाय करतात. सोमवारी सायंकाळी बलजिंदरसिंग यांच्या धाकट्या मुलाचा साखरपुडा होता. कुटुंबातील सदस्य तिकडे गेले होते. चोरट्याने या संधीचा फायदा घेत मध्यरात्री स्वयंपाकघरातील खिडकीचे



ग्रील तोडून आत प्रवेश केला. बलजिंदर यांच्या घरात कपाटाचे कुलूप तोडून २४७ सोन्याचे तसेच १ कोटीचे हिऱ्यांचे दागिने, रोख रक्कम पळवली.

**सीसीटीव्ही झाकला तरीही एका कॅमेऱ्यात चोरटा कैद**

मुलाचा साखरपुडा असल्याने बलजिंदर यांच्या कुटुंबीयांपैकी घरी कुणीही नव्हते. चोरट्याने घरात प्रवेश करण्यापूर्वी सीसीटीव्ही झाकून टाकला होता. मात्र सीसीटीव्ही झाकल्यानंतरही अन्य एका कॅमेऱ्यात आरोपी गुन्हा करताना कैद झाला. जप्त केलेल्या फुटेजच्या आधारे आरोपीचा शोध सुरू आहे.

# महिला शेतकऱ्यांच्या सक्षमतेसाठी करार

## ‘उमेद’च्या पुढाकारातून उपक्रम, विदर्भातील ४ जिल्ह्यांचा समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अकोला–** ग्रामीण भागातील महिला शेतकऱ्यांना सक्षम करत शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाने (उमेद) गोदरेज ॲग्रोव्हेटसोबत सामंजस्य करार केला आहे. त्याअंतर्गत कापूस पिकवणाऱ्या प्रमुख ९ जिल्ह्यांवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. नागपूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, परभणी, जळगाव, बीड, अकोला आणि नांदेड जिल्ह्यांचा यात समावेश आहे.

संयुक्त राष्ट्र संघाकडून २०२६ हे आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी



वर्ष घोषित करण्यात आले असून हा करार त्याच्याशी सुसंगत आहे. कृषी क्षेत्रात लिंग असमानता दूर करण्यासह उपजीविकेचे स्रोत मजबूत करण्याचा यामागे उद्देश आहे. हा करार तीन वर्षांचा असून स्वयंसहाय्यता गट व महिला शेतकऱ्यांना चांगल्या कृषी पद्धती व एकात्मिक कीड व्यवस्थापन प्रोत्साहित करत शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी काम करण्यात येणार आहे. या करारांतर्गत पहिल्या वर्षी कापूस पिकवणाऱ्या नागपूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, परभणी, जळगाव, बीड, अकोला , नांदेड जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. उवरित पान ४ आगामी तीन वर्षात या मोहिमेचा संपूर्ण महाराष्ट्रात पाच हजारांहून अधिक महिला बचत गटांना सहाय्य करण्यासाठी विस्तार करण्यात येणार आहे. तसेच कापसाव्यतिरिक्त मका आणि इतर पिकांपर्यंत या मोहिमेचा विस्तार करण्याची योजना आहे. प्रत्येक जिल्ह्यातील १०० बचत गट जोडले जाणार आहेत.

# ठाकरेंचे ४ नगरसेवक कुणाच्या गळाला?

## उद्धव ठाकरेंना कल्याण-डोंबिवली महापालिकेत मध्ये पुन्हा झटका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१मुंबई–** कल्याण : उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला कल्याण-डोंबिवली महापालिकेत दोन दिवसांत दुसरा मोठा झटका बसला आहे. कोकण विभागीय आयुक्तांकडे पक्षाच्या गटाच्या नोंदणीसाठी ११ पैकी केवळ ७ नगरसेवक उपस्थित राहिले. त्यामुळे उर्वरित ४ नगरसेवक फुटल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर ठाकरे गटाचे दोन नगरसेवक ‘संपर्क क्षेत्राच्या बाहेर’ होते. त्यानंतर आज (२० जानेवारी) गटाच्या नोंदणीच्या वेळी आणखी दोन नगरसेवक गैरहजर राहिल्याने ते चारही नगरसेवक एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या गळाला लागल्याची चर्चा सुरू आहे. कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीत शिवसेना आणि भाजप यांची युती झाली होती. शिवसेनेला ५३ तर भाजपला ५० जागांवर विजय मिळाला. शिवाय ठाकरे गट




११, मनसे ५ आणि शरद पवार गटाला १ जागा मिळाली आहे. तसेच काँग्रेसने २ जागा जिंकल्या आहेत. आता भाजप आणि शिवसेनेकडून स्वबळावर सत्ता स्थापनेसाठी प्रयत्न केले जात आहेत. त्यातच भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांना शह देण्यासाठी शिंदेंकडून ठाकरे गटाच्या नगरसेवकांना गळाला लावण्याचे प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे. महापौरपदासाठी ठाकरेंचे नगरसेवक किंग मेकरच्या भूमिकेत आहेत. कल्याण-डोंबिवली महापालिकेतील १२२ जागांमध्ये ६२ चे बहुमत आहे. भाजपला स्वबळासाठी १२ तर शिवसेनेला ९ नगरसेवकांची कमी आहे. त्यामुळे शिवसेनेने ठाकरे गटाचे नगरसेवक फोडण्याचे प्रयत्न सुरू केल्याची जोरदार चर्चा आहे. ठाकरेंचे नवनिर्वाचित नगरसेवक मधुर म्हात्रे निकालाच्या दुसऱ्याच दिवशी श्रीकांत शिंदे यांना भेटले होते. त्यानंतर कीर्ती ढोणे नॉट रिचेबल झाल्या. हे दोन नगरसेवक फुटल्याची चर्चा सुरू असतानाच आज गटाच्या नोंदणीसाठी ठाकरे गटाच्या नगरसेवकांना कोकण विभागीय आयुक्तांकडे नेण्यात आले तेव्हा राहुल कोट आणि स्वप्नाली केणे हे दोन नगरसेवकही अनुपस्थित राहिले. यावेळी शिवसेना ठाकरे पक्षाच्या गटनेतेपदी उमेश बोरगावकर आणि पक्ष प्रतोदपदी संकेश भोईर यांची निवड करण्यात आली आहे.

# चिखलदरा तालुका कृषी कार्यालय दोन वर्षांपासून अधिकाऱ्याविना; २९ पदे रिक्त

## शेती रामभरोसे, प्रशासन बघ्याची भूमिका



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१चिखलदरा**

मेळघाटातील आदिवासीबहुल चिखलदरा तालुक्यातील कृषी कार्यालयाचा कारभार रामभरोसे असून, शेतकऱ्यांच्या भवितव्याशी खेळ सुरू आहे. धक्कादायक बाब म्हणजे तब्बल दोन वर्षांपासून तालुका कृषी अधिकारी पद रिक्त आहे. अधिकारी नसलेले कार्यालय, कर्मचारीविना यंत्रणा आणि योजनांविना शेतकरी अशी भयावह परिस्थिती सध्या चिखलदऱ्यात पाहायला मिळत आहे.

केवळ अधिकारीच नव्हे तर मंडळ अधिकारी, कनिष्ठ लिपिक, अनुरेखक, वाहन चालक, चौकीदार अशी एकूण २९ पदे रिक्त आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणावररिक्त पदे असताना कार्यालय सुरू आहे असे म्हणणे म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. प्रत्यक्षात हे कार्यालय कागदावरच जिवंत, कामकाजात मृत झाले आहे.

या प्रशासकीय ढिसाळपणाचा फटका थेट शेतकऱ्यांना बसत आहे. पीक विमा, खत-बियाणे वितरण, शासकीय अनुदान, नैसर्गिक आपत्ती मदत, पीक पाहणी या सर्व योजना फाईल्समध्येच अडकल्या आहेत. साध्या सहीसाठी शेतकऱ्यांना अमरावती धारणीच्या फेऱ्या माराव्या लागत असून खर्च, वेळ व शेती तिन्ही बुडत आहेत. मेळघाटासारख्या अतिसंवेदनशील भागात कृषी विभागाला विशेष लक्ष देणे आवश्यक असताना शासन आणि कृषी आयुक्तालयाची अक्षम्य उदासीनता स्पष्टपणे दिसून येत आहे. प्रश्न उपस्थित होतो दोन वर्षे अधिकारी नसताना वरिष्ठ झोपेत होते का? २९ पदे रिक्त ठेवून शेतकऱ्यांचे नुकसान कोणाच्या माथी मारायचे? या गंभीर प्रकारामुळे शेतकरी संघटनांमध्ये प्रचंड असंतोष पसरला असून, तातडीने रिक्त पदे न भरल्यास कृषी कार्यालयावर धडक मोर्चा व तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात येत आहे. चिखलदऱ्यात शेती वाचवायची असेल, तर आधी कृषी कार्यालय वाचवा, अन्यथा ही बेपर्वाई शेतकऱ्यांच्या संतापाचा उद्रेक ठरू शकते.

# चांदूर रेल्वे नगर परिषद सभापतीपदावर भाजपाचे वर्चस्व
# नगर परिषद सभापतीपदाची निवडणूक बिनविरोध

## पाचही समितींवर भाजपाचे सभापती



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१चांदूर रेल्वे**

चांदूर रेल्वे नगरपालीकेच्या पाच विषय समितीच्या सभापतीची निवडणूक मंगळवारी (ता. २०) पार पडली. या विषय समित्यांचे सर्व सभापती अविरोध निवडून आले असून सर्व समित्यांवर भाजपाचे वर्चस्व राहिले आहे.

चांदूर रेल्वे न.प. च्या नियोजन व विकास समितीचे पदसिध्द सभापती न.प. उपाध्यक्ष असल्यामुळे उपाध्यक्ष प्रमोद उर्फ बच्चू हरगोविंद वानरे यांची सभापतीपदी निवड करण्यात आली. बांधकाम समिती सभापतीपदी गजानन उत्तमराव ठाकरे यांची अविरोध निवड करण्यात आली तर स्वच्छता, आरोग्य व शिक्षण समिती सभापतीपदी अनिल प्रताप मोटवाणी, पाणीपुरवठा समिती सभापतीपदी प्राविण्य प्रमोदराव देशमुख, महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी दुर्गा रतनलाल भूत या पाचही सभापतींची निवडणूक बिनविरोध झाली. समिती तर स्थायी नामनिर्देशित सदस्य म्हणून भाजपा गटनेता पप्पु उर्फ निलेश रमेशराव भालेराव यांची वर्णी लागली.पिठासीन अधिकारी म्हणून धिरजकुमार गोहाड (मुख्याधिकारी) यांनी काम पाहिले. यावेळी नगराध्यक्षा प्रियंका निलेश विश्वकर्मा, यांची उपस्थिती होती. मुख्याधिकारी सुप्रिया टवलारे यांची उपस्थिती होती.

# हमीभाव तूर खरेदीसाठी ऑनलाइन नोंदणीला सुरुवात

## २० फेब्रुवारीची डेडलाइन जिल्ह्यातील खरेदी केंद्रांना निर्देश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

जिल्ह्यात हमीभाव तूर खरेदीसाठी ऑनलाइन नोंदणीला सोमवारपासून सुरुवात करण्यात आली आहे. ही नोंदणी २० फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. याबाबतचे निर्देश पणन विभागाकडून जिल्ह्यातील खरेदी केंद्रांना देण्यात आले आहे. शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने हंगाम २०२५-२६ मधील हमीभाव तूर खरेदीसाठीशेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी सुरू करण्याबाबत महत्त्वाचेनिर्देश दिले आहेत. यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहे. या पत्रानुसार, हंगाम २०२५-२६ मधील तूर खरेदीस मंजुरी देण्यासाठी ५ डिसेंबर २०२५ रोजी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सध्या राज्यात हमीभावाने सोयाबीन खरेदी प्रक्रिया सुरू असून, त्याच अनुषंगाने कार्यान्वित असलेल्या सोयाबीन खरेदी केंद्रांवरच तूर खरेदीसाठी शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी सुरू करण्यात येणार आहे.

# अमरावतीत रंगणार तिसरे अखिल भारतीय एल्गार मराठी गजल संमेलन

## ७ व ८ फेब्रुवारीला संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भावनात आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

तिसरे अखिल भारतीय एल्गार मराठी गजल संमेलन संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात ७ आणि ८ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आल्याची माहिती पत्रकार भवन मध्ये आयोजित पत्रकार परिषदेत आयोजकांनी दिली.

या संमेलनात महाराष्ट्रातील १५० हून अधिक मराठी गजलकारांची उपस्थिती असणार आहे. प्रसिद्ध कवी व गजलकार वैभव जोशी हे या संमेलनाचे संमेलनाध्यक्ष असून उ? द्घाटक म्हणून डॉ. राम पंडित मुंबई हे असणार आहेत. शाहीर सुरेश कुमार वैराळकरपुणे, दगडू दादा लोमटे अंबाजोगाई, संतोष बोरगावकर डॉक्टर गणेश गायकवाड,शिवाजी जवरे डॉ दिलीप पंढरपट्टे इत्यादी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

या संमेलनाचे स्वागताध्यक्ष नाना लोडम हे असून आयोजन समितीत नाना लोडम नितीनदेशमुख, अनंतनांदुरकर, नितीनभट, संजय इंगळे तिगावकर सोबतीला सह समन्वयक म्हणून संदिप देशमुख मारुतीमानेमोड, निलेश कवडे, अजिज खान पठाण, रेणुका पुरोहित हे काम पाहत आहेत.या संमेलनात एकूण १३ मराठी गझल मुशायरे रंगणार असून एक तरबूम मुशायरा आणि परिसंवाद व गजल गायन मैफिल उर्दू मुशायरा असणार असून वैभव जोशी यांची सोबतीचा करार ही मैफिल सुद्धा असणारआहे.तिसरे अखिल भारतीय एल्गार मराठी गजल संमेलन अमरावती जिल्ह्याच्या इतिहासात मैलाचा दगड ठरणार आहे. कविवर्य सुरेश भट यांच्या नगरीत मराठी गजलेची भरगच्च मेजवानी रसिकांना मिळणार आहे.या संमेलनाच्या यशस्वीतेसाठी आयोजक म्हणून सुरेश भट प्रतिष्ठान आणि वसंतराव पालेकर प्रतिष्ठान यांचे बहुमूल्य सहकार्यलाभले आहे. या ऐतिहासिक अखिल भारतीय मराठी गजल संमेलनाचा आस्वाद घेण्याचे आवाहन तमाम गझल रसिकांना करण्यात आले आहे. आमदार परिषदेला नाना लोडम, नितीन देशमुख, अनंत नांदुरकर, मारुती मानेमोड, रवींद्र लोडम उपस्थित होते.

# पराभवाने खचुन न जाता जोमाने काम करत राहू
# आ. सुलभा खोडके यांनी व्यक्त केला विश्वास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**



नुकत्याच झालेल्या महानगर पालिकेच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला अकरा जागा मिळाल्या असल्या तरी पक्षाला मोठा फटका बसला आहे. या पराभवामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पराभूत उमेदवार व सर्व सहकाऱ्यांमध्ये कुठेतरी नाराजी दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर पराभवाने खचुन न जाता जोमाने काम करण्याचा सल्ला सर्व सहकाऱ्यांना आमदार सुलभा संजय खोडके यांनी दिला आहे.

तसेच महानगरपालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने अमरावतीकरांना दिलेले आश्वासने पूर्ण करण्याच्या दिशेने काम करत राहू, असा . विश्वासही आमदार सुलभा खोडके यांनी व्यक्त केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी विकासाचे व्हिजन व एक नियोजित कृती कार्यक्रम घेऊन अत्यंत शिस्त, पारदर्शकता आणि संघटनात्मक ताकदिनिशी या निवडणुकीला सामोरे गेली. मागील करण्यात आल्याने महापालिकेच्या २२ प्रभागांमधील सर्व ८७ जागांवर चांगले काम करणारे असे सर्वसमावेशक उमेदवार सुद्धा मिळाले त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने हि निवडणूक स्वबळावर लढविली पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास दर्शवत तसेच राष्ट्रवादीचे महासचिव (संघटक) आमदार सजय खोडके यांच्या मार्गदर्शनात सर्वांनी या निवडणुकीत चांगल्या पध्दतीने काम केले. प्रचाराला सुद्धा मतदार बांधवांचा चांगला प्रतिसाद लाभला. परंतु या निवडणुकीत राष्ट्रवादीला सहा महिन्यांपासून निवडणुकीबाबत नियोजनअपेक्षित यश मिळाले नसून अकराच नगरसेवक निवडून आले आहेत. मात्र प्रत्येक प्रभागात राष्ट्रवादीला मोठा जनाधार मिळाला असल्याचे सुद्धा आमदारांनी म्हटले आहे.अमरावतीकर जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण करण्याच्या दिशेने काम करत राहणार असून आगामी काळात आणखी मोठ्या प्रमाणावर विकासकामे उभी करण्याचा संकल्प व्यक्त करीत पराभवाने खचुन न जाता जोमाने काम करण्याचा सल्ला सुद्धा आमदार सुलभा खोडके यांनी सर्व सहकाऱ्याऱ्यांना दिला आहे. त्यांच्याया व्हिजन क्रांती कार्यक्रमाच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व सदस्यांमध्ये पुन्हा नवचैतन्य दिसून आले. त्यामुळे त्यांची ही सभा सर्वांना जोमाने काम करण्यासाठी लाभदायक ठरणार आहे.

# जिल्ह्यात दोन नवीन ग्रामपंचायतींची स्थापना

## विरगव्हाण, सालोरा खुर्द गट ग्रामपंचायतीला स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा
## जिल्ह्यातील ग्रामपंचायतींची एकूण संख्या ८४३

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती :**


संत सेवालाल महाराज बंजारा,लमाण तांडा समृद्धी योजनेंतर्गत जिल्ह्यात दोन नवीन ग्रामपंचायतींची स्थापना करण्यात आल्या आहे. तिवसा तालुक्यातील विरगव्हाण व चांदूर रेल्वे तालुक्यातील सालोरा खुर्द गटग्रामपंचायतीला स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देण्यात आला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ग्रामपंचायतींची एकूण संख्या ८४३ वर पोहोचली आहे. याबाबत शासनाने अधिसूचना जारी केल्यानंतर जिल्हा परिषद अमरावतीच्या पंचायत विभागामार्फत संबंधित पंचायत समित्यांना आवश्यक कार्यवाहीचे आदेश देण्यात आले आहेत.

चांदूर रेल्वे पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायत जळका जगतापचे विभाजन करून सालोरा खुर्द येथे नवीन ग्रामपंचायत स्थापन करण्यात आली आहे. तसेच तिवसा पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायत भिवापूरचे विभाजन करून विरगव्हाण येथे नवीन ग्रामपंचायत स्थापन करण्यात आली आहे. जिल्ह्यामध्ये ८४१ ग्रामपंचायती असताना आता यामध्ये दोन ग्रामपंचायतींचा भर पडली असून ग्रामपंचायतींची संख्या ८४३ झाली आहे. या संदर्भात शासनाच्या ग्रामविकास विभागाने ३१ डिसेंबर २०२५ रोजी अधिसूचना जारी केली असून त्यानुसार जिल्हा परिषद अमरावतीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) बाळासाहेब बायस यांनी संबंधित गटविकास अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. नवीन ग्रामपंचायतींच्या स्थापनेमुळे बंजारा व लमाण समाजाच्या तांड्यांच्या विकासाला गती मिळणार असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून मूलभूत सुविधा अधिक प्रभावीपणे उपलब्ध होणार आहेत.

# किसनराव हूंडीवाले हत्या प्रकरणाचा निकाल

## १० दोषींना जन्मठेप, भाजपच्या पहिल्या महापौरांच्या कुटुंबातील ५ जण दोषी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अकोला**



अकोला येथील बहुचर्चित किसनराव हूंडीवाले हत्या प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायालयाने आज ऐतिहासिक निकाल देत १० आरोपींना दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा सुनावली. या निकालामुळे राजकीय वा प्रशासकीय प्रभाव कायद्यापेक्षा मोठा नसतो, हा ठाम संदेश समाजाला मिळाला आहे.

गवळी समाजाचे प्रदेशाध्यक्ष व नामवंत प्रॉपर्टी व्यावसायिक किसनराव हूंडीवाले यांची ६ मे २०१९ रोजी भरदिवसा निर्घृण हत्या झाली होती. पोलीस अधीक्षकांच्या शासकीय बंगल्यालगत असलेल्या सार्वजनिक न्यास उपनिबंधक कार्यालयात ही घटना घडल्याने जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली होती.

या प्रकरणात भाजपच्या पहिल्या महापौर सुमन गावंडे यांच्या कुटुंबातील पाच सदस्य दोषी ठरले आहेत. दोषींमध्ये सुमन गावंडे यांचे पती व निवृत्त पोलीस निरीक्षक श्रीराम गावंडे, पुत्र विक्रम ऊर्फ छोटू गावंडे (भाजयुमोचे प्रदेश उपाध्यक्ष) यांच्यासह रणजीत, धीरज व प्रल्हाद गावंडे यांचा समावेश आहे. याशिवाय दिनेश राजपूत, प्रतीक तोंडे, विशाल तायडे, सतीश तायडे आणि मयूर अहिर यांनाही जन्मठेप सुनावण्यात आली.

विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी सरकारी बाजू प्रभावीपणे मांडली. निकालानंतर तक्रारदार प्रवीण हूंडीवाले यांनी आम्हाला न्याय मिळाला, अशी प्रतिक्रिया दिली. या निर्णयामुळे अकोल्यात न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

# चादूरबाजार न.प.च्या विषय सामीत्यावर प्रहारचे वर्चस्व

## पाच विषय समित्यांवर सभापती, सदस्यांची अविरोध निवड



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१चांदूरबाजार**

नगरपरीषदेच्या विविध विषय समित्यांच्या सभापती व सदस्यांची निवड पालीका कार्यालयाच्या सभागृहात पार पडली. या विषय समित्यांवर प्रहार जनशक्ती पक्षाने वर्चस्व प्रस्तापित केले आहे.

विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष मनीषा नांगलीया होत्या. सभेत पालीकेच्या पाच प्रमुख विषय समित्यांच्या सभापतींची निवड करण्यात आली. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम समीतीच्या सभापतीपदी नरेंद्र वानखडे तर सदस्यपदी घनश्याम उसरवसे,मुजफ्फर हुसेन शे. रहेमतुल्ला, तबस्सुमनिसा मो. सोहेल यांची निवड करण्यात आली. पाणीपुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता समीतीच्या सभापतीपदी अ.रहेमान शे. इब्राहिम सदस्य सचिन खुळे, मनीष नांगलीया, तबस्सुमनिसा मो. सोहेल, पुजा डिठोर, शिक्षण, क्रीडा व सांस्कृतीक समीतीचे सभापती मो. तनविर अ.मो.इसराईल सदस्य म्हणून आबिदहुसेन अ. रफीक, आशा वानखडे, रुखसानाबी एजाज अली, प्रियंका यावतकर, महिला व बालकल्याण समीतीच्या सभापतीपदी कल्याणी कोंडे, उपसभापती कनिजा फातेमा जमील अहेमद, नजमाबी मंजुर अहेमद, अर्चना कोरडे, तरन्नुम परविन मुन्तजीरखान,स्थायी समीती सभापतीपदी मनीषा नांगलीया, सदस्य म्हणून नरेंद्र वानखडे, अ.रहेमान शे. इब्राहिम, मो. तनविर मो.इसराईल, कल्याणी कोंडे, कनिजा फातेमा जमील अहेमद यांची निवड करण्यात आली. नगर परीषदेच्या सर्व विषय समित्या प्रहार जनशक्तीच्या ताब्यात आल्या आहेत. सर्व समित्यांच्या निवडीनंतर नवनियुक्त सभापतींचे नगराध्यक्षांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. पिठासीन अधिकारी म्हणून चांदूर रेल्वे नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पुनम कळंबे यांनी कामकाज पाहिले. सहाय्यक पिठासीन अधिकारी म्हणून चांदूरबाजार नगर परीषदेच्या मुख्याधिकारी गिता ठाकरे यांनी जबाबदारी सांभाळली. तर कार्यालयीन कामकाज प्रफुल्ल गाडबैल यांनी सांभाळले.

# बदलत्या हवामानाचा घाला; रब्बी व उन्हाळी पिके संकटात, शेतकरी हवालदिल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ मोर्शी**



निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांची चिंता पुन्हा वाढली आहे. खरीप हंगामातील नुकसानीच्या जखमा ताज्या असतानाच आता बदलत्या हवामानाचा फटका रब्बी व उन्हाळी पिकांना बसत आहे. कडाक्याची थंडी, पहाटेचे दाट धुके आणि तापमानातील अचानक चढ-उतार यामुळे धान पिकावर रोगांचा प्रादुर्भाव वाढला असून शेतकरी आर्थिक व मानसिक संकटात सापडला आहे.परिसरात सिंचनाची सुविधा असलेल्या शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने उन्हाळी भुईमुंग ची लागवड केली होती. पेरणीपूर्व मशागत करून वेळेत पऱ्हे तयार करण्यात आले; मात्र गेल्या आठवड्यात हवामानात झालेल्या बदलामुळे ही मेहनत वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे.शेतांमध्ये करपा, बुरशीजन्य रोग व किडींचा विळखा वाढत असून महागडी औषधे, कीटकनाशके व बुरशीनाशकांची फवारणी करूनही अपेक्षित परिणाम मिळत नसल्याने शेतकऱ्यांचा खर्च वाढला आहे. केवळ उन्हाळी गहू, हरभरा, वाटाणा आदी रब्बी पिकेही धोक्यात आली आहेत. पिकांची वाढ खुंटल्यास संपूर्ण हंगामाचे गणित बिघडण्याची भीती व्यक्त होत आहे.या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने थेट शेतशिवारात जाऊन पाहणी करून शेतकऱ्यांना तातडीचे व ठोस मार्गदर्शन करावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी
संपर्क करा 8605948853

# अमरावतीत भाजप, युवा स्वाभिमान व मित्रपक्षांची होणार सत्ता स्थापन

## सत्ता स्थापनेसाठी '४४ मॅजिक फिगर' जुळविण्यासाठी जोर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

अमरावतीचे नवे महापौरपद कोणत्या प्रवर्गसाठी आरक्षण निघते, याकडे राजकीय धुरंधरांच्या नजरा लागल्या आहेत. महापालिकेत २२ प्रभागांतून ८७ सदस्य निवडून आले आहे. महायुतीत महापौरपद हे भाजपच्या वाट्याला जाईल असे संकेत आहे. मात्र, अमरावती महापालिकेत आतापर्यंत महापौरपदाचे आरक्षण आणि रोटेशननुसार नवे महापौरपद हे सर्वसाधारण महिलांसाठी राखीव निघेल, अशी सूत्रांची माहिती आहे. १० मार्च १९९२ ते ८ मार्च २०२२ या ३० वर्षाच्या कार्यकाळात अमरावती महापालिकेत १६ महापौरांनी धुरा सांभाळली आहे. तर ९ मार्च २०२२ पासून तर आतापर्यंत महापालिकेत 'प्रशासकराज' सुरू आहे. भाजप २५, युवा स्वाभिमान पक्ष १५, काँग्रेस १५, एमआयएम १२, राष्ट्रवादी (अजित पवार) ११, शिंदेसेना ३, बसपा ३, उद्धवसेना २ आणि वंचित १ असे ८७नगरसेवक निवडून आले आहेत. भाजप, युवा स्वाभिमान व मित्रपक्षांची सत्ता स्थापन होईल, असे चित्र आहे.

महापालिकेवर युतीची सत्ता स्थापन होईल, असे राजकीय चित्र आहे. भाजपचा भगवा फडकविण्यासाठी पडद्यामागील अनेक वेगवा अमरावतीचे नवे महापौरपद कोणत्या प्रवर्गसाठी आरक्षण निघते, याकडे राजकीय धुरंधरांच्या नजरा लागल्या आहेत. महापालिकेत २२ प्रभागांतून ८७ सदस्य निवडून





आले आहे. महायुतीत महापौरपद हे भाजपच्या वाट्याला जाईल असे संकेत आहे. मात्र, अमरावती महापालिकेत आतापर्यंत महापौरपदाचे आरक्षण आणि रोटेशननुसार नवे महापौरपद हे सर्वसाधारण महिलांसाठी राखीव निघेल, अशी सूत्रांची माहिती आहे. १० मार्च १९९२ ते ८ मार्च २०२२ या ३० वर्षाच्या कार्यकाळात अमरावती महापालिकेत १६ महापौरांनी धुरा सांभाळली आहे. तर ९ मार्च २०२२ पासून तर आतापर्यंत महापालिकेत 'प्रशासकराज' सुरू आहे. भाजप २५, युवा स्वाभिमान पक्ष १५, काँग्रेस १५, एमआयएम १२, राष्ट्रवादी (अजित पवार) ११, शिंदेसेना ३, बसपा ३, उद्धवसेना २ आणि वंचित १ असे ८७नगरसेवक निवडून आले आहेत. भाजप, युवा स्वाभिमान व मित्रपक्षांची सत्ता स्थापन होईल, असे चित्र आहे.न हालचाली सुरू झाल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजपचे महापालिका निवडणूक प्रभारी आ. संजय कुटे यासह स्थानिक नेते महापौर भाजपचाच होण्यासाठी तयारीला लागले आहेत. आता केवळ आरक्षण कोणत्या प्रवर्गासाठी निघते यावरच पुढील रणनीती ठरणार आहे. महापौर उपमहापौर, स्थायी समिती सभापती, पक्षनेता ही महत्त्वाची पदे काबीज करण्यासाठी महायुती ४४ ही 'मॅजिक फिगर' जुळवत आहे.

अमरावती महापालिकेत बहुमत कोणत्याही राजकीय पक्षाला मिळाले नाही. त्यामुळे भाजप आणि काँग्रेस या दोन पक्षाने सत्ता स्थापनेच्या दिशेने वाटचाल चालविली आहे. गत दोन दिवसांपासून काँग्रेसने एमआयएम, राष्ट्रवादी (अजित पवार), बसप, उद्धवसेना गटाच्या नेत्यांशी बोलणी सुरु केल्याची माहिती आहे. सत्ता स्थापनेसाठी '४४ मॅजिक फिगर' हा आकडा जुळविण्यासाठी जोर बैठकी वाढल्या आहेत.

# शिक्षकांचा ताण वाढला: पदोन्नतीसाठी टीईटी परीक्षा अनिवार्य; महाराष्ट्र सरकारचा आदेश जारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**



महाराष्ट्र सरकारनं मंगळवारी शिक्षकांसाठी महत्वाचा निर्णय घेतला आहे. आता राज्यातील सरकारी आणि शासनमान्य शाळांतील शिक्षकांसाठी पदोन्नतीसाठी टीईटी परीक्षा उत्तीर्ण करणं अनिवार्य झालं आहे. सरकारी आदेशानुसार, ज्यांच्याकडं निवृत्तीपूर्वी ५ वर्षांपेक्षा जास्त सेवा शिल्लक आहे, त्यांना दोन वर्षांच्या आत टीईटी उत्तीर्ण करावी लागणार आहे. ५ वर्षांपेक्षा कमी सेवा असलेल्या शिक्षकांना तात्पुरतं काम चालू ठेवता येईल, पण पदोन्नतीसाठी टीईटी उत्तीर्ण असणं आवश्यक आहे, असा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

सेवेत कायम राहण्यासह पदोन्नतीसाठी टीईटी अनिवार्य : हा निर्णय सुप्रीम कोर्टाच्या मार्गदर्शनानुसार घेतला गेला आहे. न्यायालयानं आधीच स्पष्ट केलं आहे की टीईटी पात्रता केवळ नवीन नियुक्तीसाठी नाही, तर पदोन्नतीसाठी आणि सेवेत कायम राहण्यासाठीही अनिवार्य आहे. शिक्षक संघटनांनी या निर्णयावर विरोध व्यक्त केला आहे. त्यांच्या मते, दीर्घकाळ सेवा देणाऱ्या शिक्षकांवर हा निर्णय अन्यायकारक ठरू शकतो. काही संघटनांनी सुप्रीम कोर्टाकडं पुनर्विचार करण्याची मागणी केली आहे. शासनानं सांगितलं आहे की, टीईटी परीक्षा न उत्तीर्ण केल्यास पदोन्नतीसाठी अर्ज विचारात घेतला जाणार नाही. वेळेत परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास शिक्षकांना स्वेच्छा निवृत्ती किंवा अनिवार्य निवृत्ती स्वीकारावी लागू शकते. अधिक माहिती व अंमलबजावणीसाठी शिक्षकांना महाराष्ट्र शिक्षण विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर माहिती पाहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.याबाबत प्रतिक्रिया देताना मुख्याध्यापक महामंडळाचे माजी उपाध्यक्ष महेंद्र गणपुले यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, की टीईटी उत्तीर्ण करण्यासाठी शासनानं दोन वर्षांचा कालावधी निश्चित केलेला आहे. म्हणजेच या टर्ममधील शिक्षक नोव्हेंबर २७ पर्यंत प्रयत्न करू शकतात. त्यामुळे अनुभवी शिक्षकांना टीईटी परीक्षा उत्तीर्ण होण्यास पूर्ण दोन वर्षे मिळावीत. तसे टीईटी परीक्षा वर्षातून दोन वेळा घेतली जावी. जेणेकरून शिक्षकांना जास्त वेळा संधी मिळू शकेल. त्याचबरोबर एखाद्या शाळेतील बरीच वर्षे अनुभव असलेल्या शिक्षकाला डावलून टीईटी परीक्षा पास झालेल्या नवख्या शिक्षकाला पदोन्नती दिल्यास अनुभवी शिक्षकांवर अन्याय होऊ शकतो. त्यामुळे आधी अनुभवी शिक्षकाला पूर्ण दोन वर्ष परीक्षा देऊन उत्तीर्ण होण्याची संधी दिली जावी. त्याचबरोबर टीईटी संदर्भानं न्यायालय व शासन तोपर्यंत काय सुधारित निर्णय घेते, सकारात्मक निर्णय घेते का? हे पाहणं सुद्धा महत्त्वाचं आहे, असं गणपुले यांनी यावेळी स्पष्ट केलं.

# अजय नंतर गोलू,पवन या दोन आरोपींची वाढ; निलेश बदुकले हत्याकांड

## पोलिसांनी मध्यरात्री केले अटक हत्याकांड प्रकरणात नवा ट्वीस्ट!



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१चांदूर बाजार**

सोमवार रोजी चांदूर बाजार पोलीस स्टेशन हद्दीत झालेल्या हत्याकांड प्रकरणात मुख्य आरोपी अजय लंगोटे याच्या सह २ आरोपींचा समावेश झाल्याची माहिती ठाणेदार अशोक जाधव यांनी दिली आहे आरोपी गोलु लंगोटे व आरोपी पवन झटाले या दोघांना मध्य रात्री पोलिसांनी शोधून अटक केले त्यामुळे या हत्याकांडात नवा ट्वीस्ट आला आहे दिनांक १९ जानेवारी रोजी मुरूम तस्करीच्या कारणावरून अजय लंगोटे याने अपघाताचा कट रचवत अमरावती-वलगाव या मार्गावर निलेश बदुकले सहपत्नी मॉर्निंग वाक करत असतांना माल वाहू चार चाकीने मागून येऊन निशाणा बनवत अजयने ब्राम्हणवाडा थडी येथिल नामांकित गौनखनिज व्यवसायक निलेश बदुकले यांची हत्या केली होती त्यामुळे संपूर्ण चांदूर बाजार तालुका हादरून गेला होता या हत्याकांड प्रकरणात अजून किती आरोपी शामिल आहेत व सखोल चौकशी करण्यासाठी तालुक्यातील सर्व राजकीय पक्ष व नागरिकांनी समाज माध्यमातून निषेद केला व मृतक निलेश बदुकले यांच्या ब्राम्हणवाडा थडी या गावात मोठा सन्नाटा पाहायला मिळाला गावकऱ्यांनी स्वतः प्रतिष्टाने बंद करत या घटनेचा निषेद व्यक्त केला याची दखल घेत चांदूर बाजार पोलिसांनी कसून तपासाचे चक्र फिरवले या हत्याकांडात आरोपी गोलु लंगोटे हा मुख्य आरोपी अजयचा भाऊ असल्याच बोलल्या जात आहे तर आरोपी पवन झटाले हा मुख्य आरोपी अजय चा नातेवाईक असल्याची माहिती मिळत आहे गोलू व पवन या दोघांनी मृतक निलेश बदुकले यांची रेखी केली व त्यांची समूर्ण माहिती ठेवायचं बोलल्या जात आहे मृतक निलेश बदुकले सोमवारी मॉर्निंग वाक करत घरी जात असतांना आरोपी गोलू व पवणने रेखी करून मुख्य आरोपीला याची माहिती दिल्याचं बोलल्या जात आहे अजय,पवन व गोलु या ३ आरोपींनी डाव रचत निलेश बदुकले यांना सपवण्याचा प्लॅन बनवला होता अशी माहिती मिळत आहे आणखी यात कोण शामिल आहेत हे आता पोलिसांच्या तपासात हाती लागणारच आहे आयपिएस परिवेक्षाधीन अधिकारी सागर भामरे व आयपिएस उपविभागीय पोलिस अधिकारी शुभम कुमार तळ ठोकून चांदूर बाजार पोलीस स्टेशन येथे बसून आहेत यासह पोलीस विभागाच्या सर्व यंत्रणा कामाला लागल्या आहेत मुख्य आरोपी अजयला मंगळवारी न्यायालयात हजर करण्यात आले होते पोलिसांनी ५ दिवसांच्या पोलीस कोठडी च्या मागणीवरून आरोपीला २ दिवसांची पोलीस कोठडी मिळाली अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

### अवैध गौनखनिज तस्करी साठी गोलू-अजय ला अभय देणाऱ्यांवर कार्यवाही करा!

आरोपी अजय व गोलू गेल्या अनेक वर्षांपासून अवैध गौनखनिज तस्करी करत आहे शासनाचा कोटी रुपयांचा महसूल बुडवत या दोघांनी मोठी माया जमा करून ठेवली आहे संबंधित प्रादेशिक परिवहन अधिकारी व महसूल अधिकाऱ्यांच्या आर्थिक मिळवणुकी मुळे अजय-गोलुला अवैध गौनखनिज तस्करी साठी अभय मिळत असल्याची चर्चा सुरु आहे याची सुद्धा चोकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कार्यवाहीची मागणी आता नागरिक करित आहे.


# देवीचा टोप चोरीला गेला पण भक्ताची श्रद्धा नाही

## मातेचा अपमान झाला, भक्त धावून आला; पवनभाऊ विखेंकडून मुऱ्हा देवीच्या चरणी नवा टोप अर्पण

चेतन घोगरे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अंजनगाव सुर्जी**

मुऱ्हा येथील जागृत श्री मुऱ्हा देवी मंदिरात झालेल्या चोरीच्या घटनेने संपूर्ण अंजनगाव तालुक्यात खळबळ उडाली असताना, एका निस्सीम भक्ताच्या कृतीमुळे मात्र श्रद्धेचा उजेड पुन्हा एकदा उजळून निघाला. देवीचा चांदीचा टोप चोरीला गेल्याची घटना भक्तांच्या मनाला चटका लावणारी असली, तरी तेल्हारा येथील सामाजिक कार्यकर्ते व देवीभक्त श्री. पवनभाऊ विखे यांनी मातेच्या चरणी नवा टोप अर्पण करून देवावर संकट आले तरी भक्त मागे हटत नाही, हे कृतीतून सिद्ध केले.अंजनगाव तालुक्यातील मुऱ्हा गावातील श्री मुऱ्हा देवी मंदिर हे केवळ देवस्थान नसून हजारो भाविकांच्या श्रद्धेचे, विश्वासाचे आणि परंपरेचे केंद्र आहे. काल रात्री दोन अज्ञात चोरट्यांनी मंदिरात घुसखोरी करत देवीच्या मूर्तीवरील चांदीचा टोप तसेच अन्य मौल्यवान साहित्य लंपास केल्याची



घटना उघडकीस आली. सकाळी पुजाऱ्यांनी व ग्रामस्थांनी मंदिर उघडल्यानंतर ही बाब लक्षात येताच परिसरात संतापाची लाट उसळली. ही घटना केवळ चोरी नसून श्रद्धेवर झालेला आघात असल्याची भावना भाविकांतून व्यक्त होत होती.देवीच्या चरणी अर्पण केलेले दागिने चोरीला गेल्याची बातमी पसरताच अनेक भाविकांचे डोळे पाणावले. काहींना शब्दही सुचत नव्हते. मुऱ्हा देवी हे जागृत देवस्थान असल्याने या घटनेने संपूर्ण तालुक्यात हळहळ व्यक्त करण्यात आली.याच दरम्यान ही माहिती तेल्हारा येथील पवनभाऊ विखे यांच्यापर्यंत पोहोचली. देवीचा अपमान झाल्याची भावना मनात घर करून गेल्यानंतर त्यांनी क्षणाचाही विलंब न करता मुऱ्हा येथे जाण्याचा निर्णय घेतला. कोणतीही प्रसिद्धी, नाव किंवा अपेक्षा न ठेवता त्यांनी स्वतःच्या खर्चाने नवीन, सुबक असा टोप तयार करून आज सकाळी तो श्री मुऱ्हा देवीच्या चरणी अर्पण केला.चोरी करणाऱ्यांनी देवीचा टोप नेला असेल; पण भक्तांची श्रद्धा आणि मातेचा मान कोणीही चोरणार नाही, हा संदेश पवनभाऊ विखेंनी आपल्या कृतीतून दिला. त्यांच्या या भावनिक व निस्वार्थ सेवेमुळे मंदिर परिसरात काही काळ भारावलेले वातावरण निर्माण झाले. अनेक भाविकांनी डोळ्यात अश्रू आणून या कृतीचे कौतुक केले.पवनभाऊ विखे यांच्या तत्परतेचे ग्रामस्थ, भाविक आणि मंदिर प्रशासनाकडून विशेष अभिनंदन करण्यात आले. संकटसमयी देवाकडे नवस करणारे अनेक असतात; मात्र देवावर संकट आले असता धावून जाणारे भक्त फारच विरळा. पवनभाऊंनी खरी भक्ती काय असते, हे दाखवून दिले, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

दरम्यान, मंदिरातील चोरीप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखा तसेच रहिमापूर पोलीस स्टेशनच्या वतीने स्वतंत्र पथके तयार करण्यात आली असून तपास सुरू आहे. आरोपींना लवकरात लवकर अटक करण्यात येईल, असे पोलिस विभागाकडून सांगण्यात आले आहे.

# घनकचरा संकलन ठप्प कामगारांचे आमरण उपोषण सुरू




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अचलपूर**

अचलपूर-परतवाडा शहरातील घनकचरा संकलन मागील पंधरा दिवसांपासून पूर्णपणे ठप्प झाले आहे. प्रशासक कार्यकाळापासून ठेकेदाराची देयके थकीत असल्याने कचरा संकलन कर्मचाऱ्यांनी प्रथम काम बंद आंदोलन पुकारले होते. प्रशासनाकडून दखल न घेतल्याने आज बुधवारपासून कर्मचाऱ्यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे.कचरा उचल न झाल्याने शहरातील विविध भागात घरगुती कचरा व नाल्या सफाईचा कचरा साचून मोठे ढिग तयार झाले आहेत. यामुळे दुर्गंधी पसरली असून डास, माश्या व रोगराई वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.कचरा संकलनासाठी नेमलेल्या ठेकेदाराला नगरपरिषदेकडून मोठ्या प्रमाणात देयके अदा करूनही कर्मचाऱ्यांना गेल्या सुमारे १०० दिवसांपासून पूर्ण वेतन मिळाले नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. ठेकेदार व नगरपरिषद प्रशासनातील समन्वयाअभावी कर्मचाऱ्यांचे हाल होत असून त्याचा थेट फटका शहरातील नागरिकांना बसत आहे.दरम्यान, नवनिर्वाचित नगराध्यक्षा व नगरसेवकांनी प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न केले असले तरी अद्याप ठोस तोडगा निघालेला नाही. प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून घनकचरा संकलन पूर्ववत करावे, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

# वलगाव येथे दोन गटात शाब्दिक बाचाबाची

## तरुणाची दुचाकी गाडी पेटवली



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१वलगाव**

अमरावती जिल्ह्यातील वलगाव येथे दिनांक विस मंगळवार रोजी रात्री दोनच्या सुमारास धक्कादायक घटना घडली आहे वलगाव येथील असलम शाहा अजीम शाहा वय तिस वर्ष राहणार बाजारपुरा वलगाव जिल्हा अमरावती या युवकाची एम एच सत्तावीस इ डी ४०४७ एबझेट एस हि दुचाकी गाडी व त्याच्या राहत्या घराचा समोरचा भाग जाळण्यात आला आहे ही सर्व घटना घरातील व्यक्तींना माहित पडताच त्यांनी लगेचच आग विझवायला सुरुवात केली व घडलेल्या घटनेची माहिती वलगाव पोलिसांना दिली वलगाव पोलिसांना घटनेची माहिती मिळताच घटनेचं गांभीर्य लक्षात घेताच तात्काळ घटनास्थळी अग्निशामक दलाच्या जवानांसोबत धाव घेतली व परिस्थिती नियंत्रणात आणली व पंचनामा चालू केला वलगाव पोलिस आजूबाजूच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून व मोबाईल लोकेशनच्या माध्यमातून आरोपींचा शोध घेत आहे पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार दिनांक विस मंगळवार रोजी रात्री नऊच्या सुमारास आरोपी व फिर्यादी यांच्यात वलगाव येथील जुना बस स्टँड चौकात बाचाबाची व शिवीगाळ झाली होती त्यातूनच हा प्रकार घडला असावा असा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे आरोपी पेट्रोल पंप वरून बॉटलमध्ये पेट्रोल घेतानी सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये कैद देखील झाले आहे वलगाव पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली असून घटनेचा पुढील तपास वलगाव पोलीस करत आहे.




आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत